सभापतीस्थानी माननीय सभापती

'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' ही पुस्तिका न मिळाल्याबाबत

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडून प्रकाशित करण्यात येणारी अत्यंत महत्वाची असलेली 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' ही पुस्तिका आम्हाला अद्याप मिळालेली नाही. अनेक माननीय सदस्यांची याबाबत तक्रार आहे. आम्हाला मराठी व इंग्रजी भाषेतील प्रती मिळाल्या पाहिजेत.

सभापती : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ही शासनाची अत्यंत महत्वाची पुस्तिका आहे. ती कोणत्याही परिस्थितीत माननीय सदस्यांना मिळाली पाहिजे. मी याबाबत चौकशी करतो आणि इंग्रजी व मराठी भाषेतील प्रती माननीय सदस्यांना मिळतील अशी व्यवस्था करतो.

श्री.हुसेन दलवाई : धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांना
स्मृती दिनानिमित्त श्रध्दांजली अर्पण करणे.

सभापती : मी याठिकाणी एक ठराव मांडतो. शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांचा आज स्मृतीदिन आहे. सभागृहाच्या वतीने या हुतात्म्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुया. मी आपणा सर्वांना विनंती करतो की, आपण त्यांच्या स्मृतीनिमित्त एक मिनिट स्तब्ध उभे राहूया.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: प्रश्नोत्तरे

कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यातील वजन काटे तपासणीत सदोष आढळल्याबाबत

(१) * १३४१९ श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या वजनकाट्यांची तपासणी माहे जानेवारी, २०११ च्या पहिल्या आठवड्यात करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तपासणीमध्ये कोणकोणत्या साखर कारखान्यातील वजन काटे सदोष आढळून आले आहेत तसेच याबाबतचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, संबंधित साखर कारखान्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री.अनिल देशमुख यांच्याकरिता : (१) होय.

(२), (३) व (४) तपासणीमध्ये, साखर कारखान्यातील वजन काटे, ऊसाचे वजन बरोबर असल्याचे दर्शवित असल्याचे आढळून आल्याने पुढील कार्यवाहीबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.चंद्रकांत कांबळे : सभापती महोदय, या प्रश्नाला मंत्री महोदयांनी नेहमीप्रमाणे गुळमुळीत उत्तर दिले आहे. मी सभागृहाचे एका महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधू इच्छितो. ऊस उत्पादकांना दर वाढवून मिळाल्यामुळे ते खुश आहेत. दुसऱ्या बाजूला वजनामध्ये त्यांची फसवणूक केली जाते. धाडीबाबत काय प्रकार घडतात याची आपल्याला कल्पना आहे. शासन पातळीवर कोणती यंत्रणा आहे हे मी सांगायला नको. ऊस घेऊन आलेल्या गाड्यांचे कारखान्याबाहेरच्या काट्यावर ट्रायल वजन करुन नंतर कारखान्यातील काट्यावर वजन करुन वजनातील तफावतीची तपासणी केली जाईल काय?

श्री.रणजित कांबळे : स्पेसिफिक उदाहरण दिले तर निश्चितपणे करु.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या संदर्भातील हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. वजन काटे बरोबर असल्याचे आढळून आले आहे असे उत्तरात नमूद केले आहे. या संदर्भात अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी असल्यामुळे हा प्रश्न विचारण्यात आला होता. अशा वजन काट्यांची कोणाकडून तपासणी केली, कोणी तपासणी केली, कोणत्या पध्दतीने केली, केव्हा केली व किती कारखान्यातील वजनकाट्यांची तपासणी केली?

नंतर बी.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13419.....

श्री. रणजित कांबळे : महोदय, पुणे आयुक्तांकडे अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर नियंत्रकांना यासंबंधीची तपासणी करण्याचे आदेश दि. 4.11.2000 रोजी दिले होते. त्यानंतर संजय मारुती पवार या नागरिकाने दि. 11.1.2001 रोजी स्पेसिफिकली कोल्हापूरच्या संदर्भात तक्रार केली तेंव्हा उप नियंत्रक यांच्यामार्फत कोल्हापूरमधील 21 कारखान्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील वेट अँड मेझर्सची तपासणी केली असता त्यात काहीच आढळून आले नाही. तसेच या विभागाच्या उप नियंत्रकांनी तीन पथके बनवून सर्व कारखान्यांना व्हिजिट देऊन तपासणी केली.

श्री. सय्यद पाशा पटेल : महोदय, ज्याप्रमाणे दुधाचा फॅट व वजन गावातच केले जाते त्याच धर्तीवर जिल्हा परिषद अथवा पंचायत समिती सर्कलला मोठमोठ्या गावात अशा प्रकारे एखादा वजन काटा उभा करण्याचा निर्णय घेणार काय ?

श्री. अनिल देशमुख : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न पूर्णत: वेगळा आहे. कारण ज्यावेळी शेतकऱ्यांची ऊसाच्या वजनाबाबत फसवणूक होते ती होऊ नये म्हणून आपण प्रयत्न करीत असतो. त्या अनुषंगाने आपण वारंवार तपासणी करीत असतो. जेणेकरुन शेतकऱ्याच्या ऊसाचे वजन आहे तेवढेच भरले पाहिजे. यासंदर्भात आमच्याकडे नलावडे शुगल मिल्स, चंदगड तसेच हेमरस शुगर मिल्स या दोन कारखान्यांच्या संदर्भात तक्रार प्राप्त झाली असता या कारखान्यांनी वजनाचे मूल्यांकन (स्टॅम्पिंग) व्यवस्थित केलेले नसल्याचे आढळून आले व त्यासाठी त्या कारखान्यांना दंडही आकारला होता. याप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी असे प्रकार आढळतात त्यांची वेळोवेळी तपासणी करुन कारवाई करण्यात येते.

श्री. सय्यद पाशा पटेल : महोदय, मंत्री महोदयांनी सांगितलेली वस्तुस्थिती बरोबर आहे. पण जर त्या कारखान्यात एकच काटा असेल तर वजनात फसवणूक होऊ शकते. म्हणून आणखी चार वजन काटे दुसरीकडे ठेवले तर शेतकऱ्यांना न्याय मिळेल. ज्या साखर कारखान्याच्या ऊसाच्या वजन काट्यावर लोकांनी संशय व्यक्त केला त्या ठिकाणी आणखी वेगळे चार काटे उभे करण्याबाबत शासन विचार करणार काय ?

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13419.....

श्री. अनिल देशमुख : महोदय, कारखान्यात असलेल्या वजन काट्याची आपण वेळोवेळी तपासणी करीतच असतो, तसेच या वजन काट्याची दरवर्षी तपासणी करुन ते प्रमाणित केले की नाही, एनओसी घेतली की नाही हे सुध्दा पाहत असतो. त्यामुळे चार-चार वजन काटे लावण्याची गरज वाटत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कोल्हापूरमध्ये एकूण किती इलेक्ट्रॉनिक व साधे वजन काटे आहेत ? तसेच असे काही निकष ठरलेले आहेत काय की, एकूण अमुक इतके वजन केल्यानंतर या इलेक्ट्रॉनिक वजन काट्याचा सेल बदली केला पाहिजे ? या सभागृहात यापूर्वी देखील कोल्हापूर येथील साखर कारखान्यांमध्ये असलेल्या वजन काट्यांबाबत व तेथे झालेल्या गैरव्यवहारासंबंधी चर्चा झालेली आहे. त्यावेळेस शासनाने ज्या अधिकाऱ्याची बदली करुन कारवाई केली होती तोच अधिकारी आता कोल्हापूरमध्ये आलेला आहे, हे खरे आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : महोदय, संपूर्ण राज्यात इलेक्ट्रॉनिक बॅलन्सचाच वापर केला पाहिजे असा विचार आपण केला असून त्याची बहुतांशी अंमलबजावणी सुध्दा सुरु केली आहे. पण सांगण्याचे तात्पर्य असे की, इलेक्ट्रॉनिक वजन काटा असेल तरच वजन कमी जास्त करता येते असे नाही तर या इलेक्ट्रॉनिक वजन काट्याला देखील ॲडजस्टमेंट करता येते. म्हणून आपण अशा वजन काट्याला सील लावण्याचे काम केले आहे. तसेच वेळोवेळी या काट्यांची तपासणी करण्यात येते. सन्माननीय सदस्यांनी अधिकाऱ्याबाबत जो प्रश्न विचारला त्याची माहिती घेण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

मुंबईतील धारावी व बीडीडी चाळींचा पुनर्विकास बिल्डरऐवजी म्हाडाच्या माध्यमातून करण्याबाबत

(२) * १२८७७ श्री.सुभाष चव्हाण , श्रीमती अलका देसाई , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.दिवाकर रावते , डॉ.दिपक सावंत , डॉ.निलम गोऱ्हे , श्री.परशुराम उपरकर , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.अमरीशभाई पटेल , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.रामदास कदम , श्री.सुभाष चव्हाण , डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ९७६७ ला दिनांक १ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी व बीडीडी चाळ येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास विविध कारणांमुळे रेंगाळला असल्याने म्हाडाच्या माध्यमातून या प्रकल्पाचे काम पूर्ण करावे अशी अनेकांची मागणी होत असल्याचे माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धारावीच्या पुनर्विकास प्रकल्पाचे काम म्हाडा तर्फेच पूर्ण होण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सचिन अहिर,श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता : (१), (२) व (३) म्हाडा प्राधिकरणाने धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या एकूण ५ सेक्टरपैकी सेक्टर ५ हा म्हाडामार्फत विकसित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे व सदरचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, संपूर्ण आशिया खंडात धारावीची झोपडपट्टी सर्वश्रेष्ठ व सर्वात मोठी आहे. धारावीच्या झोपडपट्टीच्या संदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, धारावी व बीडीडी चाळीच्या मूळ योजनेला शासनाने केव्हा मान्यता दिलेली आहे, धारावी व बीडीडी चाळीमध्ये म्हाडामार्फत जी घरे बांधण्यात येणार आहेत ती धरे गरिबांना किती रुपयांमध्ये मिळणार आहेत ? उत्तरात असे म्हटले आहे की, "हा प्रस्ताव विचाराधीन आहे". त्यामुळे म्हाडा मार्फत विकास करणा-या प्रस्तावाला शासन केव्हा मान्यता देणार आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, धारावी व बीडीडी चाळीच्या प्रोजेक्टकडे व्हायटल प्रोजेक्ट म्हणून पहात आहोत. धारावी व बीडीडी चाळीच्या प्रोजेक्टला विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. विलंबाची कारणे वेगवेगळी आहेत ती कारणे मी सभागृहाला देऊ शकतो परंतु मुळामध्ये कोणत्या बाजूने जावयाचे यासंदर्भात शासनामध्ये विचार सुरु आहे. काही सेक्टरचे काम म्हाडाच्या माध्यमातून करता येईल काय यासंदर्भातील बाब शासन तपासत आहे. एवढेच नाही तर काही सेक्टर म्हाडाच्या माध्यमातून व काही सेक्टर्स टेंडर्स पध्दतीने खाजगी विकासकांना दिले तर योग्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

होईल काय याबाबत सुध्दा विचार सुरु आहे. अशा प्रकारचे काम देत असतांना शासनाला जास्तीत जास्त फायदा कसा होईल व त्यापेक्षाही सर्वसामान्यांना परवडणारी घरे देण्याच्या दृष्टिकोनातून शासनाचे प्रयत्न सुरु असून यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेतला जाणार आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी असे वाक्य उच्चारले आहे की, "धारावीची झोपडपट्टी संपूर्ण आशिया खंडात सर्वश्रेष्ठ आहे." त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, "सर्वश्रेष्ठ" हा जो शब्द सन्माननीय सदस्यांनी उच्चारलेला आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात यावा अशी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे. संबंधित शब्द कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, धारावीची झोपडपट्टी मोठी आहे ही वस्तुस्थिती आहे परंतु मुंबई शहराला आणि महाराष्ट्र राज्याला धारावी झोपडपट्टी भुषणावह नाही असे माझे स्पष्ट मत आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "म्हाडा प्राधिकरणाने धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या एकूण ५ सेक्टर्सपैकी सेक्टर ५ हा म्हाडामार्फत विकसित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. तर राहिलेल्या चार सेक्टर्सचा विकास कधीपर्यंत होणार आहे ? बीडीडी चाळींची अवस्था फार भयानक आहे. परंतु मोडकळीस आलेल्या बीडीडी चाळीच्या संदर्भातील काहीही माहिती मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात दिलेली नाही. त्यामुळे बीडीडी चाळीची माहिती का देण्यात आली नाही ? तसेच बीडीडी चाळीचा विकास कधीपर्यंत केला जाणार आहे याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माझी माहिती अशी आहे की, एक बिल्डर बीडीडी चाळीच्या कामासाठी फार इंटरेस्टेड आहे व तो बिल्डर यासंपूर्ण प्रपोजलमध्ये आडकाठी आणतो आहे हे खरे आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, यामध्ये एकंदर पाच सेक्टर्स असून पाचवा जो सेक्टर आहे त्याचा विकास म्हाडाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ....

केला जाणार आहे. बाकीच्या सेक्टर्सच्या संदर्भात निविदा मागविता येईल किंवा अजून काय करता येईल याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर एक बैठक झाली असून यासंदर्भात अंतिम निर्णय येणे बाकी आहे. एक सेक्टरची जबाबदारी म्हाडाच्या अनुषंगाने घेतली तर येणा-या ६-७ महिन्यांमध्ये आपण हे काम सुरु करु शकतो. बीडीडी चाळीच्या संदर्भात आतापर्यंत २ बैठका झाल्या असून यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर एक बैठक घेऊन कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद स्वीकारल्यानंतर धारावीच्या प्रश्नाला एक वेगळीच कलाटनी मिळाली असून ही फार आनंदाची बाब आहे व त्याचे आम्ही स्वागत करतो. सगळया झोपडपट्टयांची जागा बिल्डरच्या घशात घालणे व पुन्हा वेगळया झोपडपट्टया तयार करण्याचे काम मुंबईमध्ये सुरु आहे त्याला जर शह द्यावयाचा असेल तर पाचही सेक्टर्स व सर्वच्या सर्व झोपडपट्टया जवळपास ५०० एकरामध्ये वसलेल्या आहेत. त्यामुळे या झोपडपट्टीच्या विकासाचे काम म्हाडा मार्फत करण्यात आले तर गरीबांना मोठया प्रमाणात घरे उपलब्ध होऊ शकतील, वेगळा एफएसआय मिळेल तसेच म्हाडाची आर्थिक स्थिती अधिक चांगली होईल. त्यामुळे सर्व झोपडपट्टीचा विकास म्हाडा मार्फत केला जाणार आहे काय, बीडीडी चाळीचा विकास देखील म्हाडा मार्फत केला जाणार आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12877.....

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय राज्यमंत्र्यांनी समर्पक उत्तर दिलेले आहे तरी सुध्दा मी पुन्हा एकदा आपल्याला सांगू इच्छितो की, धारावीचा पुनर्विकास प्रकल्प ब-याच वर्षापासून प्रलंबित आहे. त्याकरिता आंतरराष्ट्रीय निविदा मागविण्याचा प्रयत्न केला होता. काही जणांनी त्यामध्ये एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट दिला होता परंतु हळूहळू ही संख्या कमी होत गेली आणि आता फक्त सहा विकासक या प्रक्रियेमध्ये राहिलेले आहेत. दुस-या बाजूला या विकास कामाच्या निविदांकरिता जी किंमत ठरविण्यात आली होती ती अतिशय कमी होती त्यामुळे विकासकांचा फायदा होईल आणि राज्याचा काहीही फायदा होणार नाही अशा प्रकारच्या तीव्र भावना व्यक्त करण्यात आल्या होत्या. सन्माननीय सदस्य श्री हुसेन दलवाई यांनी जी भावना व्यक्त केली होती त्याचबरोबर मूळ प्रश्न विचारण्या मागे सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्या भावना माझ्यासमोर आलेल्या आहेत.या संदर्भात मी एक बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये अशा प्रकारचा विचार पुढे आला आहे की सुरुवातीला सेक्टर पाच विकास करण्यासाठी म्हाडाला द्यावा . इतर चार सेक्टरच्या बाबतीत एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट देण्यात आलेले आहेत व त्या पुढची प्रक्रिया अजून करावयाची आहे. त्याला दोन तीन वर्षे होऊन गेलेली असल्यामुळे पुन्हा नव्याने प्रक्रिया करावयाची किंवा काय याबाबतीत चर्चा चालू आहे त्यामुळे आज मी त्याबाबतीत निश्चित काहीही सांगू शकत नाही. काही कालावधीमध्येच आम्ही या दोन्ही बाबतीत ठरविणार आहोत. परंतु त्या दृष्टीकोनातून विचार चालू आहे असे मला सांगितले पाहिजे.त्याचबरोबर राज्यामध्ये घरे बांधण्याकरिता म्हाडा ही यंत्रणा उभी करण्यात आली असून आतापर्यंत त्यांनी बरीच घरे बांधलेली आहेत. त्यांच्याकडे सेक्टर पाचचे काम सोपवावे आणि या कामामध्ये आतापर्यंत बराच उशीर झालेला असल्यामुळे हे काम त्यांनी ताबडतोब सुरु करावे असे मला वाटते.तेव्हा सेक्टर पाचचे काम लवकरात लवकर सुरु करता येईल काय हे पहावे लागेल कारण त्यामध्ये एलिजिबिलीटी ठरविणे वगैरे सारखे अन्य प्रश्नही आहेत. हा काही ग्रिन फिल्ड प्रॉजेक्ट नाही तर हा ब्राऊन फिल्ड प्रोजेक्ट आहे त्यामुळे या प्रोजेक्ट मध्ये काही समस्या आहेत परंतु या सेक्टरमध्ये लवकरात लवकर पुनर्विकास झाला पाहिजे आणि जे जास्तीत जास्त पैसे पैसे उपलब्ध होतील ते पैसे राज्याकडे आले पाहिजे अशीच माझी भूमिका आहे.त्यामुळे इतर जे

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चार सेक्टर आहेत त्यांचा पुनर्विकास जर खाजगी विकासकाकडून करावयाचे असेल तर मग निविदा प्रक्रिया बदलावी लागेल त्यामध्ये सध्या जी किमान किंमत ठरविण्यात आली आहे ती किंमत योग्य नाही असे माझे स्पष्ट मत झालेले आहे. त्यामुळे या संदर्भात पुन्हा विचार करुन इतर चार सेक्टर करता खाजगी विकासकांकडून पुन्हा निविदा मागवावयाच्या किंवा काय हे ठरवावे लागेल. या संदर्भात सर्वच्या सर्व काम म्हाडाला देण्यात यावे असा सुध्दा एक प्रस्ताव पुढे आला होता. निविदा मागविण्याच्या प्रक्रियेमध्ये बराच वेळ जातो त्यामुळे सुरुवातीला सेक्टर पाचचे काम म्हाडाला देता येईल काय या संदर्भात आम्ही अत्यंत गंभीरपणे विचार करीत आहोत.इतर चार सेक्टरचे काय करावयाचे हे नंतर ठरवू या. याचे कारण असे की त्याठिकाणी आणखी काम्प्लीकेटेड ब्राऊन फिल्ड स्कीम आहेत.सभापती महोदय या ठिकाणी मी सांगू इच्छितो की,सरकार या विषयाकडे अत्यंत गांभीर्याने पहात आहे.एक आदर्श प्रकल्प झाला पाहिजे असे मला वाटते, त्याचबरोबर हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुढे पुनर्विकास कसा करावयाचा यांसंबंधी आपल्याला दिशा मिळेल. काल सुध्दा नगर विकास विभागाच्या मागण्यांवरील उत्तराच्या वेळी मी सांगितले होते की ,जमिनीमध्ये जी व्हॅल्यू लॉक्ड आहे ती मात्र राज्य सरकारकडे आली पाहिजे. अर्थात त्यामध्ये खाजगी विकासकाला आपल्याला निश्चितपणे समावेश करुन घ्यावे लागेल.एवढी सर्व यंत्रणा सुरुवातीला राज्याच्या संस्थेला उभी करता येणार नाही परंतु ते करीत असतांना पारदर्शकपणे आणि योग्य पध्दतीने स्पर्धा झाली पाहिजे असे मला वाटते.पाच सेक्टरचे काम खाजगी विकासकाला द्यावयाचे असेल आणि त्यासाठी जर पाच किंवा सहा विकासक जर पुढे आले तर त्यामध्ये रिंग होण्याची शक्यता असते त्यामुळे त्यांना जर काम द्यावयाचे असेल तर एक एक किंवा दोन दोन सेक्टरचे काम त्यांना द्यावयाचे काय या सर्व विषयावर गंभीरपणे विचार चालू आहे.हे काम देत असतांना अत्यंत पारदर्शकपणे काम झाले पाहिजे आणि त्यातून राज्याला नफा मिळाला पाहिजे त्याचबरोबर तेथे राहणा-या झोपडपट्टीवासियाना चांगल्या प्रकारची घरे मिळाली पाहिजेत या दृष्टीने लवकरच निर्णय घेण्यात येईल, अशा प्रकारे मी आपल्याला आश्वासन देऊ इच्छितो.

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय विस्तृत उत्तर दिलेले आहे तरीसुध्दा माझे दोन प्रश्न आहेत. धारावीतील सेक्टर पाचचा पुनर्विकास करण्यासाठी आर्थिक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दृष्टया म्हाडा सक्षम आहे काय किंवा बाकीच्या सेक्टरचा पुनर्विकास करण्यासाठी म्हाडा सक्षम आहे काय ? त्याचबरोबर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सेक्टर पाच किंवा इतर ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून अनेक लघू उद्योजक असून त्यांचे लहान लहान व्यवसाय आहेत तेव्हा त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने म्हाडा विचार करणार आहे काय ?

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी आता सांगितल्याप्रमाणे जरी सर्व सेक्टरचे काम राज्याच्या संस्थेकडे देण्याबाबतचा विचार पुढे आला असला तरी आता फक्त एकाच सेक्टरबाबत आपण विचार करीत आहोत. पुढील सेक्टरचे काम राज्याच्या संस्थेला देण्याबाबत अजून विचार झालेला नाही. याबाबत मी बैठक घेतली असता त्यामध्ये म्हाडाला सेक्टर 5 चा विकास करता येईल अशी आमची धारणा झाली आहे. परंतु हा विकास करीत असतांना त्याठिकाणी जे लघू उद्योजक आहेत त्यांच्या राहणीमानाचा व रोजगाराचा प्रश्न आहे. त्यामुळे त्यांचा निश्चितपणे विचार करण्याची संकल्पना पुढे आली आहे. त्यांना वगळून कोणत्याही प्रकारे आपल्याला पुर्नविकास करता येणार नाही हे मी निश्चितपणे सांगतो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय योजनाबध्द असा कार्यक्रम सभागृहासमोर ठेवला त्याचे मी स्वागत करतो. त्याचबरोबर ज्याप्रमाणे या ठिकाणी ब्राऊन फिल्ड आहे त्याप्रमाणे बीडीडी चाळीचा ग्रीन फिल्ड आहे, त्याठिकाणी कोणतीही अडचण नाही. त्यामुळे बीडीडी चाळीचा पुर्नविकास करतांना शासनाची हीच भूमिका राहील काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, ही भूमिका निश्चितपणे तपासून पहाण्याचे काम करीत आहोत. बीडीडी चाळीच्या संदर्भात दोन-तीन प्रस्ताव आमच्यासमोर आले आहेत. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्याठिकाणी ग्रीन फिल्डची परिस्थिती नाही. एका बाजूला व्हायटल प्रोजेक्ट करीत असताना दुसऱ्या बाजूला दुसरी भूमिका घेता येईल काय? त्यामुळे एका प्रस्तावामध्ये हे काम म्हाडाने करावे आणि दुसऱ्या प्रस्तावामध्ये हे काम जॉईंट व्हेचरने करावे असे सुचविण्यात आले आहे. हे करीत असतांना त्यामध्ये रहिवाशी, भाडेकरु आणि विकासक अशी ट्रायपार्टी करता येईल काय या दृष्टीने चर्चा होणे अपेक्षित आहे. धारावीचा निर्णय झाल्यानंतर याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक लवकरात लवकर घेण्यात येईल आणि त्याप्रमाणे दिशा ठरविण्याचे काम केले जाईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, घटनेने आपल्याला अन्न, वस्त्र व निवारा हे तीन मूलभूत हक्क दिले आहेत. अन्न व वस्त्राचा प्रश्न सोडविण्याच्या परिस्थितीत आपण आहोत. परंतु मुंबई व इतर शहरामध्ये निवाऱ्याचा प्रश्न अतिशय बिकट झालेला आहे. आज सामान्य लोकांना परवडणारी घरे उपलब्ध होत नाहीत. अशा परिस्थितीत हे शासन धारावीचे सेक्टर 5 डेव्हलप करीत आहे. बीडीडी चाळीसारख्या अनेक प्रॉपर्टीज शासनाच्या मालकीच्या आहेत त्या खाजगी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

ता.प्र.क्र. 12877...

श्री.प्रकाश बिनसाळे....

डेव्हलपरकडून डेव्हलप केल्यानंतर त्याठिक्राणी जो रिसेल कॉपोनंट निर्माण होणार आहे त्यावर शासन काही बंधने आणणार आहे की नाही? ज्यामुळे शासनाच्या जमिनीवर झालेल्या विकासामधून सामान्य माणसाला मुंबई शहरामध्ये परवडणारी घरे मिळतील. मुंबई शहरामध्ये अनेक सोसायटयांचा पुनर्विकास करण्यासाठी लोक पुढे येत आहेत, परंतु त्यांचे मुख्य प्रवर्तक चुकीच्या पध्दतीने बिल्डरशी साठगाठ करुन योजना करीत असतात. त्या सोसायटयांच्या मुख्य प्रवर्तकांना जेव्हा ही योजना कन्सेप्च्युअलाईज्ड होईल त्यावेळी त्यांच्या आर्थिक उत्पन्नाबद्दल ॲफिडेव्हिट देण्याचे बंधन त्यांच्यावर घालणार काय?

श्री. सचिन अहिर : माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे खाजगी विकासकांच्या बाबतीत प्रायजिंग करण्याचे धोरण आपण तयार केले नाही. ज्यावेळी म्हाडा पुनर्विकास करण्याचे काम करते त्यावेळी सर्वसामान्यांना परवडणाऱ्या घरांची प्राईस लिस्ट आपल्याकडे असते.

श्री. प्रकाश बिनसाळे : अनेक ठिकाणी एमआरपी करण्यात येते. तर मग याठिकाणी सरकारी जमिनीवर वाटेल तेवढी रिसेल प्राईस लावण्याची संधी आपण विकासकांना देणार आहात काय?

श्री. सचिन अहिर : कोणत्याही खाजगी जमिनीवर केलेल्या विकास कामांचे प्राईजिंग करण्याबाबत आता मी याठिकाणी सांगू शकत नाही. परंतु सरकारी जमिनीवर म्हाडामार्फत पुनर्विकास करीत असतांना म्हाडाच्या तयार असलेल्या प्राईस लिस्टप्रमाणे प्राईजिंग करण्याचे काम केले जाईल. माननीय सदस्यांनी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, एखाद्या सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत विकासकाकडून किंवा सोसायटीच्या मुख्य प्रवर्तकांकडून प्रस्ताव आल्यानंतर त्यांची आर्थिक परिस्थिती अनेक्सर 1, अनेक्सर 2 आणि अनेक्सर 3 या तिन्ही प्रक्रियेमधून तपासण्याचे काम केले जाईल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्ह्यातील 7 महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांबाबत

(3) *13618 श्री.संजय केळकर, श्री.रामनाथ मोते, श्री.धनंजय मुंडे, श्री.विनोद तावडे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) ठाणे जिल्ह्यातील सात महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रकारच्या अनधिकृत बांधकामांचा आढावा घेऊन ते निष्कासित करणेबाबत कोणती कारवाई करण्यात येत आहे,
(2) उक्त प्रश्नी सुरू असलेली कार्यवाही पूर्ण करण्यास महानगरपालिका प्रशासनाच्या विलंबामुळे अनधिकृत बांधकामे वाढून पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात सुरू झालेली आहेत ही बाब माहे ऑक्टोबर, 2010 मध्ये वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(3) असल्यास, अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची कार्यवाही लवकर पूर्ण व्हावी याबाबत शासनस्तरावर कोणते धोरण स्वीकारले आहे वा स्वीकारण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1), (2), (3) व (4) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका 1/2007, 35/2007, 36/2007 मध्ये वेळोवेळी दिलेल्या निर्देशां नुसार ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामे व सार्वजनिक जागेवरील अतिक्रमणांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.सद्य:स्थितीत वरील जनहित याचिकेमधील मा.उच्च न्यायालयाच्या सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणांच्या विरूद्ध कालबद्धरित्या कार्यवाही करण्याच्या निर्देशांच्या अनुषंगाने एकूण सुमारे 2 लाख अतिक्रमणधारकांना संबंधित कायद्यातंर्गत नोटीसा देण्यात आल्या असून मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अतिक्रमणधारकांना वास्तव्याचा पुरावा सादर करण्याची व त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रतिकूल निर्णय दिल्यास शासन नियुक्त अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करण्याची मुभा देण्यात आली आहे.अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयानंतरच दिनांक 1.1.2000 नंतरची अपात्र अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्या- तील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यांच्या व्याप्तीचा विचार करता उचित धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील लोकांसाठी हा अत्यंत महत्वाचा विषय आहे.हा जिल्हा मुंबईच्या जवळ आहे.त्याठिकाणी प्रचंड लोकसंख्या असून तेथे 7 महापालिका आहेत. देशामध्ये असा कोणताही जिल्हा नाही की ज्याठिकाणी एवढ्या मोठ्या संख्येने महापालिका आहेत. आता याठिकाणी अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत प्रश्न निर्माण झाले आहेत. तेथील जमिनीच्या किंमती वाढू लागल्यानंतर तेथे मोठ्या प्रमाणात भू-माफिया निर्माण झाले असून त्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या बरोबर धुमाकूळ घातलेला आहे आणि सध्या तेथे मोठया प्रमाणात बांधकामे होत आहेत. परंतु शासन याबाबतीत उदासीन असून ठाणे जिल्ह्याच्या प्रश्नामध्ये लक्ष घालत नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी प्रश्न विचारावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, हा अनेक वर्षापासूनचा विषय आहे.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांना सांगू इच्छितो की, हा विषय कसाही असला तरी आपण प्रश्न विचारण्याच्या बाबतीतील जी पध्दत आहे, ती स्वीकारु या.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, याबाबतीत माझे तीन स्पेसिफीक प्रश्न आहेत. 1990 मध्ये काकोडकर समिती नेमली.त्यानंतर अग्रवाल समिती नेमली. तसेच निरनिराळया महापालिकांच्या समित्या स्थापन करण्यात आल्या.त्यानंतर डिसेंबर 2010 मध्ये याठिकाणी चीफ सेक्रेटरींच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आणि डिसेंबरमध्ये झालेल्या अधिवेशनामध्ये सांगण्यात आले होते की, आम्ही यासंबंधात एक सर्वंकश धोरण जाहीर करु. त्यानंतर काही महिने उलटून गेले तरी त्याबाबतीत काहीही धोरण जाहीर केलेले नाही. यापूर्वी शासनाने 28 जानेवारी 2008 रोजी जी.आर.काढला होता.त्यामध्ये अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने करावयाच्या अनेक गोष्टींचा उल्लेख केला होता.त्यानुसार त्यामध्ये याबाबतीतील अल्टीमेट जबाबदारी आयुक्तांवर असेल असेही सांगण्यात आले होते. त्यानुसार आपण ठाणे जिल्ह्यातील किती महापालिकांवर कारवाई केली? हा पहिला प्रश्न आहे.दुसरा प्रश्न असा आहे की,तेथे ज्या अनधिकृत चाळी किंवा इमारती आहेत त्याबाबतीत मागच्या वर्षी मी स्वत: माजी माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण साहेबांना 24,110 लोकांचे निवेदन दिले होते की, ज्या जुन्या इमारती आहेत, ...

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी प्रश्न विचारावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मी प्रश्न विचारीत आहे . . ..

सभापती : आता मी सन्माननीय सदस्यांना खाली बसावयास सांगेन.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझा याबाबतीत प्रश्न आहे...

सभापती : सन्माननीय सदस्यांनी जरी हा प्रश्न उपस्थित केला असला तरी त्याचा अर्थ असा नाही की, तुम्ही सदरहू प्रश्न डेव्हलप करण्यासाठी 6 मिनिटे घेतली पाहिजेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, या जिल्ह्यातील ज्या इमारती आहेत, त्या नियमाकूल करण्याकरता शासनाने कोणते धोरण आखलेले आहे? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, कोर्टाने झोपडपट्टीवासियांच्या बाबतीत जो आदेश दिलेला आहे, तो विषय फक्त ठाणे जिल्ह्यापुरताच आहे. पण याबाबत माझी अशी माहिती आहे की, शासन मुदत मागण्याच्या मन:स्थितीमध्ये आहे. तेव्हा या भागातील 15-20 लाख झोपडपट्टी वासियांना दिलासा देणे आवश्यक आहे.सध्या त्यांना ज्यापध्दतीने नोटीसेस् बजावल्या जात आहेत, त्याबाबत शासन कोणत्या प्रकारची ठोस भूमिका घेणार आहे जेणेकरुन तेथील लोकांना दिलासा मिळेल ? असे माझे तीन स्पेसिफीक प्रश्न आहेत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या सदनामध्ये या विषयाच्या बाबतीत वारंवार चर्चा झालेली आहे आणि त्याविषयी शासनाची भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. मला असे वाटते की, आपण या विषयाकडे दोन प्रकारे पाहिले पाहिजे. एकतर अनधिकृत बांधकामे हा विषय वेगळा आहे आणि अतिक्रमण हा विषय वेगळा आहे. आपण आज जी कारवाई करीत आहोत किंवा याबाबतीत शासन जी काही भूमिका घेत आहे ती अतिक्रमण झालेल्या बांधकामाच्या बाबतीत आहे आणि हे अतिक्रमण शासनाच्या विविध संस्थांच्या जागेवर झालेले आहे. आता ते अतिक्रमण काढून टाकण्याच्या संदर्भात कारवाई सुरु आहे. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली आहे. त्या समितीने यासंबंधात कोकण विभागीय आयुक्तांना कारवाई करण्याच्या बाबतीत सर्वाधिकार दिलेले आहेत. हा विषय अतिशय व्यापक स्वरुपाचा आहे. आपण जर पाहिले तर ठाणे जिल्ह्यात अनधिकृत बांधकामे जवळजवळ 4 लाख 95 हजार 483 म्हणजे 5 लाख इतकी आहेत आणि 2,10,363 ठिकाणी अतिक्रमणे आहेत. याठिकाणी अतिक्रमण केलेले असल्यामुळे तेथील रहिवाशांकडे असलेले 2000 सालापर्यंतचे वास्तव्याचे पुरावे पाहून ते अधिकृत आहेत की नाहीत हे तपासण्यासाठी कोकण विभागीय आयुक्तांची नेमणूक केलेली आहे. मात्र या कामाची व्याप्ती प्रचंड असल्यामुळे नित्याचे काम करुन हे काम माझ्याकडून होणार नाही असे कोकण विभागीय आयुक्तांनी शासनाच्या लक्षात आणून दिल्यामुळे शासनाने कोकण विभागीय आयुक्तांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या मदतीसाठी उप जिल्हाधिकारी दर्जाचे, अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाचे 17 अधिकारी दिलेले आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशोधित प्रत / अशोधित प्रत नाही

ता. प्र.क्र. 13618.....

श्री. भास्कर जाधव.....

या प्रकरणाची छाननी आता सुरु आहे, ती छाननी पूर्ण करण्यासाठी शासनाला आणखी सहा महिन्याचा कालावधी वाढवून मिळावा अशा प्रकारची विनंती शासनाच्या वतीने हायकोर्टाकडे करण्यात आलेली आहे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : हा अनधिकृत बांधकामाचा विषय फक्त ठाणे जिल्हयापुरता मर्यादित नाही. पूर्ण राज्यामध्ये अनधिकृत बांधकाम सातत्याने वाढत आहे. विशेषत: विदर्भामध्ये अनधिकृत बांधकाम मोठया प्रमाणात वाढलेले आहे. लोक अनधिकृत बांधकाम करतात आणि गुंठेवारी नियमानुसार ते नियमानुकुल करतात. गुंठेवारी अधिनियम सायलेंट आहे त्यामुळे लोकांना अनिधिकृत बांधकाम करण्याची सवय लागलेली आहे. गुंठेवारी नियमामुळे अनधिकृत बांधकाम अधिकृत करण्यात येते. गुंठेवारीचा कायदा सन 2001 पूर्वी जे अनधिकृत बांधकाम झालेले आहे त्यांना नियमानुकुल करण्यासाठी आहे. परंतु विदर्भामध्ये ही प्रॅक्टीस सातत्याने सुरु आहे. याला आळा घालणार काय? अन्यथा डेव्हलपमेंट कंट्रोल रुल आणि एमआरटीपी ॲक्ट पूर्ण कोल्याप्स होईल, म्हणून याबाबतीत उपाययोजना करणार काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, हा प्रश्न फक्त ठाणे जिल्ह्यापुरता मर्यादित आहे. सन्मानीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, ती वस्तुस्थिती खरी आहे. आता शहरामध्ये मोठया प्रमाणात अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामे मोठया प्रमाणात वाढत आहेत. म्हणून भविष्य काळात या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने काही नियम केले आहेत आणि त्याची कायद्यात तरतूद सुध्दा केलेली आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, अनधिकृत बांधकामे होत आहेत. अतिक्रमणे होत आहेत, ही बाब खरी आहे. प्रकरणे न्यायालयात जातात, न्यायालय निर्देश देतात. या पध्दतीने काम सुरु आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, शासन या बाबतीत वेळ मागून घेत आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. वाढती लोकसंख्या विचारात घेता, निवासाची सोय नसल्यामुळे अनधिकृत बांधकामे होत आहेत. परंतु ती रोखण्याची जबाबदारी महानगरपालिकेतील ज्या अधिकाऱ्यांवर आहे, त्यांच्या हलगर्जीपणामुळे, त्यांच्या सहकार्याने किंवा अन्य काही मार्गाने ही सगळी अनधिकृत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र. 13618.....

श्री. रामनाथ मोते....

बांधकामे होत आहेत. म्हणून ही अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी शासनाकडून कोणत्या प्रकारची उपाययोजना होणार आहे याचा खुलासा करण्यात यावा. तसेच या अनधिकृत बांधकामाला आणि अतिक्रमणाला जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर ठोस अशी कोणती कारवाई करण्यात येणार आहे?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या संदर्भात्ील एक कायदा विधिमंडळाने पारित केलेला आहे. ज्या अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रामध्ये अशा प्रकारचे अनधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमण होईल ते अनधिक्रम बांधकाम किंव अतिक्रमण लक्षात आणून दिल्यानंतर जर त्या संबंधित अधिकाऱ्याने त्या संदर्भात कारवाई केली नाही तर त्या अधिकाऱ्या वर सुध्दा दंडाच्या रक्कमेपासून ते जेलची शिक्षा देण्यापर्यंतची तरतूद कायद्यामध्ये केलेली आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाने तो कायदा पारित केलेला आहे. परंतु हा कायदा अंतिम मान्यतेकरिता राष्ट्रपती महोदयांकडे असल्यामुळे अद्याप त्याला अंतिम मंजुरी मिळालेली नाही. पण ज्या दिवशी या कायद्याला अंतिम मंजुरी मिळेल त्या दिवशी यातील बरेचसे प्रश्न सुटतील अशी स्थिती आहे.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील हा प्रश्न आहे. ठाणे जिल्हयातील बऱ्याच लोकांनी शिष्टमंडळे घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदने दिलेली आहेत. ठाणे जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे आहेत हे मान्य आहे. सभापती महोदय, या संबंधात माझे तीन प्रश्न आहेत. जे बांधकाम झालले आहे ते तोडणे अशक्य आहे. त्यामुळे सन 2010 पर्यंत मुदत वाढ देऊन कोणत्याही परिस्थितीमध्ये अशा रीतीने अनधिकृत बांधकाम होणार नाहीत यासंबंधात शासन निर्णय घेणार काय आणि कायदा अधिक कडक करणार काय, ज्या शासनाच्या जागेवर अनधिकृत घरे बांधलेली आहेत त्यांना शासन सोसायटयांना जमिनी देते त्याप्रमाणे त्यांच्याकडून मोबदला घेऊन त्यांच्या सोसायटयांना जमिनी देणार काय, उल्हासनगरच्या इमारती जशा अधिकृत केल्या तशा ठाणे जिल्हयातील इतर ठिकाणच्या विशेषत: ठाणे शहरातील इमारती अधिकृत करणार काय?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र. 13618.....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, शासन म्हणून बोलत असताना थोडेसे बंधन असले तरी विचार केला पाहिजे की, 2010 सालापर्यंतच्या अनधिकृत बांधकामांना आणि अतिक्रमणांना परवानगी देणे कितपत योग्य आहे, याचा राज्याच्या आणि आपल्या सर्वांच्या हिताच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. पंरतु तशा प्रकारचा कोणताही निर्णय करणे आज तरी शक्य नाही, असे मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगतो.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13618 ..... श्री. भास्कर जाधव...

दुसरी बाब अशी की, शासनाच्या जमिनीवर या ठिकाणी जी अनधिकृत बांधकामे केलेली आहेत त्यांना जागा देण्याच्या संदर्भात विचार करणे यामुळे सुध्दा अत्यंत चुकीचा पायंडा पडेल आणि ते घातक होईल. म्हणून त्या दृष्टीने विचार करणे योग्य आहे, असे मला वाटत नाही. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात काही कायदा करणार काय असा तिसरा प्रश्न विचारला. आज तरी अशी बाब शासनाच्या विचाराधीन नाही. आपण 1995 पर्यंतच्या लोकांना अधिकृत करु शकलो. 2000 पर्यंतच्या लोकांना अधिकृत करण्याबाबत 2007 मध्ये सुप्रीम कोर्टाकडे परवानगी मागितलेली आहे. अद्याप त्याला मान्यता मिळालेली नसल्यामुळे 2010 च्या बाबतीत भाष्य करणे उचित नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उल्हासनगरच्या बाबतीत शासनाने जो निर्णय घेतला त्याबाबतचा उल्लेख केला. त्यामध्ये आणि यामध्ये मूलभूत फरक असा आहे की, उल्हासनगरला अनधिकृत बांधकामे झालेली होती. त्या ठिकाणी अतिक्रमणाच्या बाबतीत निर्णय इ ाला नव्हता. त्या ठिकाणी स्वत:च्या जागेवर कोणाचीही परवानगी न घेता बांधकाम केलेले होते. बांधकाम करीत असताना दिलेल्या परवानगीपेक्षा वाढीव बांधकाम केलेले होते. म्हणून त्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला. ज्या ठिकाणी अतिक्रमणे आहेत त्या बाबतीत हा निर्णय घेणे उचित नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

पुणे शहरातील पीएमपीच्या बसेसना वारंवार आगी लागण्याच्या घडत असलेल्या घटना

(४) * १३९६६ श्रीमती दिप्ती चवधरी : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे (जि.पुणे) येथे सध्या मोठ्या प्रमाणात वाढत असलेल्या अपघातांबरोबरच, पीएमपीच्या बसेसला आग लागण्याचे प्रकार माहे जानेवारी, २०११ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या घटनेस जबाबदार असणाऱ्यांवर तसेच पीएमपी बसेसची दुरुस्ती करुन आग लागणाऱ्या प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) माहे डिसेंबर, २०१० ते जानेवारी, २०११ च्या दरम्यान पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांच्या बसेसमध्ये विविध कारणास्तव आग लागण्याच्या चार घटना घडल्या आहेत.

(२) व (३) या घटनांची चौकशी करण्यात आली असून, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. ने या चारही घटनेसंदर्भात संबंधित आगार देखभाल अभियंता यांना कारणे दाखवा नोटिस पाठवून खुलासा मागविण्यात आला आहे. तसेच या आगार देखभाल अभियंता यांना आगारा अंतर्गत संबंधित कर्मचाऱ्यांवर चौकशीअंती कारवाई करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या मध्यवर्ती कार्यशाळा विभागाकडून आगार कार्यशाळांना स्टार्टरचे कव्हर शिवाय बसेसना स्टार्टर बसविण्यात येवू नयेत याबाबतच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत तसेच बसेसचे इंजिन वॉशिंगचा कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, इलेक्ट्रिक वायरिंगची तपासणी करून आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात येऊन, अशा घटना पुन्हा घडणार नाही याकरीता सर्व स्तरावर खबरदारी घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील लोकसंख्या 55 ते 60 लाख आहे आणि 1 लाख लोकसख्येला 40 बसेस असाव्यात असा संकेत आहे. त्याप्रमाणे त्या ठिकाणी जवळपास 2500 बसेसची आवश्यकता असताना महानगरपालिकेच्या ताफ्यात फक्त 1200 बसेस आहेत. त्यातील 300 बसेस नेहमी नादुरुस्त असतात. त्यामुळे फक्त 900 बसेस रस्त्यावर धावत असतात. त्या ठिकाणी अचानक चालू बसमध्ये आगी लागण्याचे चार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकार घडले. त्यामुळे फक्त नागरिकांमध्येच नाही तर पीएमपीएलचे जे कर्मचारी आहेत त्यांच्यामध्ये सुध्दा भीतीचे वातावरण आहे. या बसेसना ज्या आगी लागलेल्या आहेत त्या कोणत्या कारणांमुळे लागलेल्या आहेत, या आगी तांत्रिक बिघाड झाल्यामुळे लागल्या की कंपनीतून गाडी येतानाच त्यामध्ये काही बिघाड असल्यामुळे लागल्या ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत लेखी स्वरुपात उत्तर देताना कोणत्या कारणांमुळे आगी लागल्या याचे उत्तर दिलेले आहे. त्या ठिकाणी थोड्या तांत्रिक कारणामुळे लागी लागल्या. विशेषकरुन आपण जो स्टार्टर मारतो तो मारत असताना त्या ठिकाणी लूज कनेक्शन राहणे, त्यामुळे होणाऱ्या स्पार्कींगमुळे आजूबाजूला पडलेल्या डिझेलने पेट घेणे अशी कारणे आहेत. पहिल्या बसने जो पेट घेतला ती बस 1994 सालची होती. त्या बसमध्ये आग लागली. परंतु त्यामध्ये कोणत्याही प्रकारची जीवित हानी झालेली नाही किंवा कोणीही जखमी झालेले नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्या शहरामध्ये 900 बसेस आहेत. पण तशी वस्तुस्थिती नसून सध्या त्या कंपनीच्या मालकीच्या 1200 बसेस आहेत आणि 326 बसेस भाडे तत्वावर घेतलेल्या आहेत. जेएनएनयुआरएम अंतर्गत 650 बसेसची त्यांनी मागणी केलेली आहे. त्यापैकी 180 बसेस मिळालेल्या असून उर्वरित बसेस त्यांना लवकरच मिळतील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी आगी लागण्याच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. आतील लूज कनेक्शन वगैरे बाबत सांगण्यात आले. जेव्हापासून पीएमपीएल निर्माण झाले तेव्हापासून पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिकांच्या अखत्यारीत असलेली बससेवा एकत्रित करुन त्यासाठी आपण खास वेगळे अधिकारी नेमले. त्यानंतर या कारणासाठी आपण सगळ्या दुरुस्त्या केल्या असे म्हणत आहात. या पीएमपीएलच्या कार्यकारिणीची बैठकच गेले अनेक महिने झालेली नाही. बसला दरवाजा उजवीकडे असावा की, डावीकडे असावा यावरुन वर्षभर बस खरेदी रेंगाळलेली आहे. या पीएमपीएलच्या कारभारामध्ये सुधारणा व्हावी, अशा पध्दतीने आगी लागू नयेत, लोक रस्त्यावर चिरडले जात आहेत, दर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13966..... डॉ. नीलम गोऱ्हे ....

महिन्याला 30 तरी लोक पुणे शहरामध्ये या बसेसखाली चिरडून मरतात, विशेषत: लहान मुले मरतात, आपण रेकॉर्ड काढून बघावा, म्हणून या पीएमपीएलच्या कारभारासाठी आपण शासकीय अधिकाऱ्यांची जी कमिटी नेमली आहे त्याचा आढावा ताबडतोब घेऊन याबद्दलच्या सुधारणांची माहिती आपण महिनाभराच्या आत सदनासमोर ठेवणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, केवळ या कमिटीची बैठक घेण्याकरिता सांगण्यात येणार नाही तर तशा प्रकारच्या जर सूचना असतील तर त्या कमिटीची, पुणे शहरातील सर्व संबंधित लोकप्रतिनिधींना बोलवून आपल्या दालनामध्ये तशा प्रकारची बैठक आयोजित केली जाईल

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13966..... श्री.भास्कर जाधव....

आणि सन्माननीय सदयांच्या ज्या सूचना असतील त्या सूचनांसह उचित असे निदेश देण्यात येतील.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मुंबई शहराप्रमाणे पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर ही दोन्ही शहरे वेगाने विकसित होत आहेत. या दोन्ही शहरांमध्ये आज वाहतुकीची मोठ्या प्रमाणावर कोंडी होत आहे. या शहरांमध्ये ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या समस्येला सार्वजनिक वाहतूक व्यवस्था हा उपाय होऊ शकतो. यामध्ये दोन महानगरपालिका आहेत. या दोन्ही संस्थांची मिळून एक कंपनी निर्माण करण्यात आली. त्यामध्ये पुणे महानगरपालिकेचा आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा हिस्सा आहे. तेथील सध्याची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कधीही फायद्यात चालत नाही, तोट्यातच चालते. ज्याप्रमाणे मुंबई शहरामध्ये बेस्टची वाहतूक विद्युत पुरवठा विभागाला होत असलेल्या नफ्यामधून चालविली जाते. बेस्टकडून लोकांना चांगली सेवा मिळत आहे. त्याप्रमाणे पुणे, पिंपरी-चिंचवड या शहरांमध्ये पीएमपीएलची वाहतूक सुरु आहे. त्यासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान दिले जात नाही ते दिले जाईल काय ? त्याचप्रमाणे या कंपनीच्या महाव्यवस्थापकपदी आयएएस दर्जाचे अधिकारी नेमावयाचे आहेत. अनेक दिवस अधिकारी दिले नव्हते. पण सध्या जे अधिकारी नेमले आहेत. ते अनिच्छेने काम करीत आहेत. त्यांना त्या पदावर काम करण्याची इच्छा नाही. एवढया महत्वाच्या शहरांच्या वाहतूक व्यवस्थेचे काम पाहण्यासाठी वर्षानुवर्षे शासन अधिकाऱ्यांची नेमणूक करीत नाही, यासाठी शासन ठोस पावले उचलणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : मुंबईच्या बेस्टच्या धर्तीवर या दोन शहरांच्या वाहतुकीसाठी शासन काही शेअर्स देईल काय असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. तसा प्रस्ताव या क्षणापर्यंत आल्याचे मला माहीत नाही. तसा प्रस्ताव आला तर तो प्रस्ताव तपासून व पडताळून पाहून तसे शक्य होत असेल तर ते केले जाईल. सन्माननीय सदस्यांनी अधिकाऱ्यांबाबत असेही म्हटले आहे की, तेथे नेमण्यात आलेले अधिकारी स्वेच्छेने गेले नसल्यामुळे ते नाराजीने काम करीत असतील तर त्याची माहिती घेतली जाईल. प्रत्येक अधिकाऱ्यांना आपल्या कर्तव्यात कसूर करता येणार नाही, अशाप्रकारची त्यांना समज दिली जाईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई अग्निशमन दलाचे टँकर भरणारे दहा हजार नळखांब बंद असल्याबाबत

(5) * 13269 **श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे , ॲड.उषाताई दराडे , श्री.रमेश शेंडगे , श्री.सतीश चव्हाण , श्री.अमरीशभाई पटेल , डॉ.सुधीर तांबे , श्री.हुसेन दलवाई, श्री.विजय सावंत, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.सुभाष चव्हाण** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईत आग आटोक्यात आणण्यासाठी नाक्यानाक्यांवर बसविण्यात आलेले सुमारे 10 हजार 220 नळखांब बंद असल्याचे दिनांक 5 जानेवारी, 2011 वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर नळखांब सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये एकूण 10157 अग्निशमन नळखांब असून त्यापैकी 2261 नळखांब कार्यरत आहेत व 7896 नळखांब बंद अवस्थेत आहेत.

(2), (3) व (4) मुंबई शहरातील विविध भागात ठराविक वेळेत पाणी पुरवठा होत असल्यामुळे, आगीच्या वेळी आग विझविण्यासाठी अग्निशमन नळखांबातून पाणी उपलब्ध होईलच याची खात्री नाही. त्यामुळे बऱ्याच वेळा सदर नळखांबाचा वापर आग विझविण्यासाठी होत नाही. त्यामुळे अग्निशमन केंद्राकडे पाण्याच्या टँकरची सुविधा करण्यात आली आहे व टँकरमध्ये पाणी भरण्यासाठी 24 तास सुविधा उपलब्ध आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, काही दिवसापूर्वी मुंबईतील एका मोठ्या झोपडपट्टीला आग लागली. त्याचे परिणाम आपण सर्वांनी पाहिले आहेत. अनेक दिवसांपासून मुंबईतील फायर हायड्रण्टची परिस्थती गंभीर झाली आहे. हे फायर हायड्रण्ट व्यवस्थित ठेवण्यासाठी गेल्या 10-20 वर्षांत मुंबई महानगरपालिकेने एकही पैसा खर्च केलेला नाही अशी मला माहिती मिळाली आहे. मुंबईत लोक दाटीवाटीने रहात आहेत, वाहतुकीची समस्या आहे, एखाद्या ठिकाणी आग लागल्यास ती विझविण्यासाठी पाणी उपलब्ध होऊ शकत नाही. ही वस्तुस्थिती असताना या हायड्रण्टसबाबत एवढे दुर्लक्ष होण्याचे कारण काय, मला असेही कळले आहे की, ही योजना बंद केली गेली आहे. या योजनेऐवजी दुसरी योजना सुरु करण्याबाबत शासनाने अभ्यास केलेला आहे काय, हे हायड्रण्टस मेंटेन का केले नाही ?

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13269....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हे फायर हायड्रण्ट आहेत. एखाद्या ठिकाणी आग लागल्यानंतर अग्निशमन दलाची गाडी तेथे जाते आणि त्या गाडीचे पाईप त्याला जोडून आग विझविण्यासाठी पाणी घेण्याचे काम केले जाते. सभापती महोदय, सगळ्यांना माहीत आहे की, मुंबई शहरामध्ये आता कोठेही 24 तास पाणी मिळत नाही. त्यामुळे या लाईनला पाणी असतेच असे नाही. त्यामुळे मुंबईत 14 ठिकाणी पंपिंग स्टेशन्स निर्माण करण्यात आले असून त्यातून अग्निशमन दलाच्या टँकरमध्ये पाणी भरण्यात येते आणि त्यातून आग विझविण्याचे काम केले जाते.

पूर्वी मुंबई शहरामध्ये 150 मीटरवर एक याप्रमाणे फायर हायड्रण्ट बसविले जात होते. परंतु मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आता 24 तास पाणी उपलब्ध होत नसल्यामुळे ही योजना जवळजवळ बारगळली आहे. एक हायड्रण्ट बसविण्यासाठी 18 हजार रुपये खर्च येतो.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनेकदा फूटपाथ, रस्त्यांची कामे केली जातात त्यामुळे दुरुस्तीचे थर साचून हे हायड्रण्ट जमिनीखाली गेलेले आहेत. त्यामुळे त्यांची दुरुस्ती व्यवहार्य होऊ शकत नाही. परिणामी ही योजना बंद पडलेली आहे. एका बाजूला हे हायड्रण्ट बंद असून दुस-या बाजूला हायड्रण्टवर काही रक्कम खर्च केली जात आहे. चुकीची रक्कम खर्ची टाकली जात असेल तर त्याची माहिती घेण्याचे काम शासन स्तरावरुन होईल.

श्री. हेमंत टकले : हा लोकांच्या जीवनमरणाशी निगडित असा प्रश्न आहे. आग निवारण करण्यासाठी पाणी हा एवढा एकच उपाय आपल्या जवळ आहे काय ? या सगळया व्यवस्थेमध्ये आपल्याला यासाठी दुस-या पर्यायाचा विचार करुन त्याचे संशोधन करुन त्याची प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणी करण्यासाठी सुरक्षिततेचा दुसरा उपाय शोधून काढण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : होय. केवळ पाण्यावर अवलंबून राहाण्या ऐवजी अन्य मार्गाने आग विझविता येईल का यासंबंधीचे संशोधन सुरु आहे. त्याची अंमलबजावणी करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाशिक जिल्ह्यातील म्हसरूळ येथील महानगरपालिकेच्या विद्यानिकेतन शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारातून झालेली विषबाधा

(६) * १३८६७ श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.राजन तेली, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अरुण गुजराथी , श्री.रमेश शेंडगे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.हेमंत टकले , श्री.विनायकराव मेटे , श्री.धनंजय मुंडे , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.रामनाथ मोते : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील म्हसरुळ येथील महानगरपालिकेच्या विद्यानिकेतन शाळा क्रं.९ मधील सुमारे ४४ विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारातून विषबाधा झाल्याची घटना दिनांक २१ जानेवारी, २०११ रोजी घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने याप्रकरणात दोषी असलेल्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती ?

श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण : (१) नाशिक महानगरपालिका शिक्षण मंडळ संचालित विद्यानिकेतन क्र.९ म्हसरुळ या शाळेतील विद्यार्थ्यांना दिनांक २१/१/२०११ रोजी शालेय पोषण आहार योजने अंतर्गत दिलेल्या वरण-भातामुळे काही विद्यार्थ्यांना मळमळ होऊन पोटात दुखत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. अशा विद्यार्थ्यांची तपासणी स्थानिक डॉक्टर व जिल्हा रुग्णालयामार्फत करुन आवश्यक वैद्यकीय उपचार करण्यात आला. तथापि या विद्यार्थ्यांना विषबाधा झाली नसल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी त्यांच्या दि.२४/१/२०११ च्या अहवालाद्वारे प्रमाणित केले आहे.

(२) व (३) या प्रकरणाची चौकशी उपायुक्त (प्रशासन), नाशिक महानगरपालिका यांच्याकडून करण्यात येत असून त्या विषयीचा त्यांचा अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे. सध्या पोषण आहार बनविण्याचे काम श्री.शक्ती महिला बचत गटाकडून काढून घेण्यात आले आहे व त्यांच्या विरुध्द पंचवटी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी उपायुक्त (प्रशासन) यांचा चौकशी अहवाल तसेच अन्न भेसळीबाबत प्रयोग शाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या निष्कर्षाच्या आधारे पुढे नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

श्री. जयप्रकाश छाजेड : हा शालेय पोषण आहाराचा विषय आहे. राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना शासनाच्या या योजनेच्या माध्यमातून शालेय पोषण आहार दिला जातो. महानगरपालिकेच्या शाळेत शिकणा-या गरीब विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये जेवण केल्या नंतर त्यांना त्याचा त्रास झाला आणि त्या सर्वांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये भरती करावे लागले. प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, सिव्हिल सर्जनने कोणत्याही प्रकारची विषबाधा झालेली नाही असे

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्टिफिकेट दिलेले आहे. दुस-या उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, या प्रकरणी चौकशी चालू असून अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे. म्हणजे एका बाजूला मुलांना त्रास झाल्याचे मान्य केलेले आहे. त्याना मळमळल्या सारखे वाटल्यामुळे रुग्णालयामध्ये दाखल करावे लागलेले आहे. हा प्रश्न केवळ एका शाळेपुरताच मर्यादित नाही. अनेक वेळा पोषण आहारामध्ये कुठे अळया सापडल्याच्या, अन्नधान्य निकृष्ट दर्जाचे असल्याच्या बातम्या नेहमी वर्तमानपत्रातून येत असतात. तेव्हा शालेय पोषण आहार योजनेंतर्गत दिल्या जाणा-या आहाराच्या दर्जावर, क्वॉलिटीवर शासनाकडून नियंत्रण ठेवले जाणार आहे की नाही ?

श्री. भास्कर जाधव : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. पोषण आहाराच्या दर्जा विषयी शासनाकडून काही काळजी घेतली जाणार आहे की नाही, असा सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न आहे. पोषण आहार कोणत्या दर्जाचा दिला जावा या संबंधीचे धोरण निश्चित आहे. तरीही सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे या योजनेची तपासणी जे जे अधिकारी करतात त्यांना तशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी असेही सांगितले की, पोषण आहारामध्ये अळया, दगड, माती सापडल्याच्या तक्रारी येतात. सभापती महोदय, मी या संदर्भात आपल्या परवानगीने एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या घटनेच्या खोलात जाऊन मी माहिती घेण्याचा प्रयत्न केला. या विषबाधेबाबत जेव्हा चर्चा होते त्यावेळी पोषण आहारामुळे विषबाधा होते अशा प्रकारची चर्चा होते. या प्रकरणाची मी सर्व माहिती घेतली. या शाळेची 1ली ते 7वी पर्यंतची पटसंख्या 569 आहे. ज्या दिवशी विषबाधा झाली त्या दिवशी 520 मुले शाळेमध्ये हजर होती. केवळ 3 मुलींना मळमळ होण्यास सुरुवात झाली. मग अन्य मुलींना विचारण्यात आल्यानंतर त्यांनी देखील "आम्हालाही तसा त्रास होतो" असे सांगितले त्यावेळी त्यांना हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तपासणी केल्यानंतर त्याना कोणत्याही प्रकारची विषबाधा झालेली नाही असे सिव्हिल सर्जनने सांगितले. असा प्रकार त्या ठिकाणी घडला.

सभापती महोदय, मला हेही सांगितले पाहिजे की, पोषण आहार पुरविण्याबाबत वाईट स्पर्धा सुरु झालेली आहे. एका महिला बचत गटाला मिळालेले पोषण आहाराचे काम आपल्याला मिळावे यासाठी अशा प्रकारचे उपद्व्याप केले जात आहेत असे प्रथमदर्शनी लक्षात आलेले आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एका बाजूला पोषण आहाराचा दर्जा चांगला असला पाहिजे, मुलांना दर्जेदार पोषण आहार मिळाला पाहिजे हे पहात असताना दुसरीकडे सर्व मुलांच्या जीविताशी कोणी खेळण्याचा प्रयत्न करीत आहे काय याचाही शोध घेण्याची गरज भासलेली आहे.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आदरणीय मुख्यमंत्री याठिकाणी बसले आहेत. मला असे वाटते की, या प्रकरणामध्ये सखोल जाऊन दुसरी बाजू तपासली पाहिजे. एका बाजूला विषबाधा झाली नसल्याचा डॉक्टरांनी अहवाल दिला आहे. प्रयोगशाळेत पोषण आहाराचे नमुने पाठविले आहेत. प्रत्यक्ष जेवण्यापूर्वी मुख्याध्यापकांनी तयार केलेल्या जेवणाची टेस्ट घ्यायची असते, ते जेवणातील नमुने आणि उकिरड्यावर जे अन्नपदार्थ टाकले होते तेही तपासणीसाठी पाठविले आहेत. त्यासंबंधीचा अहवाल आल्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घ्यावा लागेल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विषबाधा झाली नसल्याचे अहवालात नमूद केले आहे. उत्तरामध्ये अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भेसळ केली नाही असे म्हणणे असेल तर गुन्हा कसा दाखल झाला?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी स्पेसिफिक प्रश्न मांडला आहे. सिव्हील सर्जननी मुलांची तपासणी केल्यानंतर त्यांचे निष्कर्ष आणि अहवाल सादर केला आहे. धान्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठविले असून जेवणाचे नमुने देखील तपासणीसाठी पाठविले आहेत. त्याचा अहवाल आल्यानंतर अंतिम निर्णयापर्यंत येऊ हे मी सांगितले आहे. त्याठिकाणी मोठया प्रमाणावर नागरिकांनी गर्दी केली होती. नागरिकांनी शिक्षकांवर प्रेशर आणले. प्रेशर आणल्यानंतर गुन्हा दाखल करण्याशिवाय पर्याय नसतो, म्हणून या प्रकरणात गुन्हा दाखल झाला आहे. जोपर्यंत प्रयोशाळेचा अहवाल येत नाही तोपर्यंत कारवाई करता येणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. माननीय सदस्यांनी आरोप केला आहे. जे ठेके घेतात त्यांच्याकडून आपल्याला टेंडर मिळाले नाही म्हणून दुसऱ्याचे टेंडर कसे फेल जाईल यासाठी कॉम्पिट केले जाते. शासन या प्रकरणाची दखल घेऊन सीआयडी मार्फत चौकशी करुन ज्या ठेकेदारांनी असा प्रकार केला असेल त्यांना काळ्या यादीत टाकण्याचे काम केले जाईल काय?

श्री.भास्कर जाधव : मी स्वच्छपणे सांगितले आहे. शासनाने कोणतीही बाब लपवून ठेवलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची सीआयडी चौकशी करण्याची आवश्यकता नाही. साधा सोपा प्रश्न आहे. या स्पर्धेमध्ये कोण कोण होते त्याची माहिती सहज घेता येईल. ती माहिती समोर आल्यानंतर आपोआप सगळ्या गोष्टी उघड होतील. त्यामुळे सीआयडी चौकशीची गरज नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जळगांव महानगरपालिकेतील अनधिकृत बांधकामांबाबत

(७) * १२६८९ श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.मनीष जैन , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव महानगरपालिकेच्या प्रभात कॉलनी चौकातील खुल्या भूखंडावर बेकायदा लँडमार्क कॉम्प्लेक्स गेल्या १८ वर्षापासून बांधण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सतत तक्रारी होऊनही संबंधितांवर तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई झालेली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याबाबत व अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१), (२), (३) व (४) तत्कालीन जळगांव नगरपरिषदेच्या निर्णयानुसार जुना आठवडी बाजार, अतिक्रमित झोपड्या व भंगार बाजाराचे पुनर्वसन मेहरुण सर्वे नं.२९/१अ/१ या किस्टोन कन्स्ट्रक्शन कंपनी प्रयव्हेट लिमिटेड यांच्या मालकीच्या जमिनीवर करण्यात आले व त्या जमिनीच्या बदल्यात सदर कंपनीला नगर रचना योजना क्र.३ (अंतिम) मधील खुल्या जागेसाठी ठेवलेली आरक्षण क्र.जे.व के.(एकूण क्षेत्र ६१२.३५ चौ.मी.), खालील खुली जागा देण्यात आली.

वरीलपैकी आरक्षण क्र.जे मध्ये तळ + पहिल्या माळ्याचे बांधकाम वाणिज्यिक प्रयोजनासाठी नगरपालिकेच्या मंजुरीने करण्यात आले आहे.

मूळ मंजूर नगररचना योजनेतील खुल्या जागेसाठीचे आरक्षित भुखंड वरीलप्रमाणे किस्टोन कन्स्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट लिमिटेड यांना बदलीने दिले असल्यामुळे ते रहिवास विभागात अंतर्भूत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ९१ अंतर्गत कार्यवाही आवश्यक असल्याने त्यासंदर्भात जळगाव महानगरपालिकेने शासनाचे मार्गदर्शन मागितले असून त्यानुषंगाने प्रकरण तपासण्यात येत आहे.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, जळगाव महापालिकेच्या प्रभात कॉलनी चौकातील खुल्या भूखंडावर अनधिकृत बांधकाम झाल्याबाबतचा हा प्रश्न आहे. तत्कालीन नगरपालिकेचा हा भूखंड आहे. नगरपालिकेने ठराव क्रमांक ४५४, दिनांक ३०.१.९२ अन्वये मे.किस्टोन कन्स्ट्रक्शन कंपनी यांना विकासासाठी दिला होता. नगररचना योजना, जळगाव क्रमांक ३ मधील जागेवर क्षेत्रफळ ६१२ चौ.मी. रहिवासाकरिता असल्याचे स्पष्टपणे नमूद केलेले असताना त्या जागेवर व्यापारी संकुल उभे राहिले आहे. करोडो रुपयांची दुकाने बांधली गेली आहेत. जागेच्या बदल्यात जागा असा कोणताही कायदा अस्तित्वात नव्हता आणि आजही नाही. तरी देखील १०० टक्के बांधकाम झाले आहे. खुल्या जागेबाबत रहिवाशांना विश्वासात न घेता बांधकाम केलेले आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ९१ नुसार फेरफार करणे आवश्यक होते. १८ वर्षानंतर आता पत्र दिले आहे. अशाप्रकारे बेकायदेशीर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

२३-०३-२०११ (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) K.३

SGB/ ST/ D/ १२:५०

ता.प्र.क्र.१२६८९.... श्री.दिलीपराव सोनवणे.....

अनधिकृत बांधकाम केलेले व्यापारी संकुल तातडीने निष्कासित करण्यात येईल काय? बांधकामास परवानगी आणि ऑक्युपेशन सर्टिफिकेट देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय?

नंतर एल.१..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12689.....

श्री. भास्कर जाधव : महोदय, यासंदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ही घटना सन 1992 मध्ये घडली असून त्यावेळेस जळगांव शहरात नगरपालिका अस्तित्वात होती. ज्या ठिकाणी हे संकुल उभारण्यात आलेले आहे ती जागा भंगार बाजार म्हणून ओळखली जात होती. या ठिकाणी भंगार सामानाचा बाजार भरत होता. हा भंगार बाजार शहराच्या बाहेर जावा असा निर्णय त्यावेळच्या नगरपालिकेने घेतला आणि त्या जागेवर व्यापारी संकुल उभारण्यात आले. प्रामुख्याने ही जागा प्राईम लोकेशनचे ठिकाण असल्याने या भंगार बाजाराच्या शेजारीच एका व्यक्तीची 594 चौरस मीटर एवढी जागा होती. त्या व्यक्तिला त्याच्या जागेच्या मोबदल्यात शहराच्या कुठल्या तरी भागात, रिमोट एरियात जागा देण्यात आली आणि या भंगार बाजार व त्या व्यक्तिच्या जागेवर बांधकाम करण्याची परवानगी दिली गेली. ही परवानगी घेताना सन 1966 च्या एमआरटीपी ॲक्ट प्रमाणे नगरपालिकेने परवानगी घेणे आवश्यक होते पण त्यावेळेस ती घेतली नाही आणि सन 1992-94 या काळात असे संकुल उभे राहिले.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(तारांकित प्रश्न क्र. 13726)

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री. हुसेन दलवाई : महोदय, अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारुन देखील ते सभागृहात उपस्थित राहत नाहीत, हे योग्य नाही.

डॉ. दीपक सावंत : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांची प्रकृती ठीक नसल्याने ते उपस्थित राहू शकले नाहीत. परंतु सभागृहात एकदा प्रश्न पुकारल्यानंतर तो विषय सभागृहाची प्रॉपर्टी होतो. त्यावर सभागृहातील कोणताही सन्माननीय सदस्य प्रश्न विचारु शकतो.

सभापती : सभागृहात एकदा प्रश्न पुकारल्यानंतर प्रश्न विचारणारे सन्माननीय सदस्य जरी अनुपस्थित असले तरी त्याबाबतची माहिती असणारे सन्माननीय सदस्य उपप्रश्न विचारु शकतील, त्याला आपण परवानगी देतो. त्यामुळे सन्माननीय सदस्य उपस्थित असले अथवा नसले तरी त्याने फरक पडत नाही. तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांची प्रकृती ठीक नसल्याचे येथे सांगण्यात आले, म्हणून ते उपस्थित राहू शकले नाहीत.

श्री. हुसेन दलवाई : महोदय, अशा परिस्थितीत अगोदरच माननीय सभापतींकडे पत्र देणे आवश्यक आहे. खरे तर हा नैतिकतेचा प्रश्न आहे.

डॉ. दीपक सावंत : महोदय, सभागृहात एकदा प्रश्न पुकारल्यानंतर त्यावर कोणत्याही सन्माननीय सदस्याला प्रश्न विचारण्याची संधी मिळू शकते, असे ठरलेलेच आहे.

....3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदूर्ग जिल्ह्यात गॅस वितरण एजन्सीज वाढविण्याबाबत

(9) * 14026 **श्री.राजन तेली, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वाढती लोकसंख्या पाहता सिंधुदूर्ग जिल्ह्यात कणकवली, मालवण, सांवतवाडी, कुडाळ या गावात एक गॅस एजन्सी असल्याने गृहवापरासाठी लागणाऱ्या इंधनाचा कायम तुटवडा निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, 2011 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर ठिकाणी अधिक वितरक एजन्सीज नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, श्री.अनिल देशमुख यांच्याकरिता : (1) हे खरे नाही. मात्र, सणासुदीच्या दिवशी गॅसधारकांच्या मागणीत वाढ झाल्यास गॅस पुरवठा वितरकांकडून मागणीनुसार होत नाही.

(2) राज्यस्तरीय समन्वयक तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्राप्त पत्रा अनुसार सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या मार्केटिंग प्लॅनप्रमाणे दोन वितरक, तसेच राजीव गांधी ग्रामीण एलपीजी वितरक या योजनेअंतर्गत दोन वितरक नेमण्याचे प्रस्तावित आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. राजन तेली : महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गॅस एजन्सीजच्या बाबतीत मला असे निदर्शनास आणावयाचे आहे की, सध्या या जिल्ह्यात ज्या गॅस एजन्सीज आहेत त्यांच्याकडे वेळेवर गॅसचा पुरवठा होत नसल्याच्या तक्रारी तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या समित्यांकडे वरचेवर प्राप्त होतात. तसेच या एजन्सीजमार्फत गरजूंना गॅस पुरवठा होण्याऐवजी हॉटेल्स व काळा बाजार करणारे यांनाच असा पुरवठा करण्यात येतो. सर्वसामान्य ग्राहकांना वेळेवर गॅसचा पुरवठा व्हावा यासाठी शासन कोणती कारवाई करणार आहे ? तसेच जास्तीत जास्त लोकांना गॅसचा फायदा मिळावा म्हणून एखादी एजन्सी वाढविण्याचा प्रयत्न शासन करणार काय ?

....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 14026.....

श्री. रणजित कांबळे : महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आपण जवळपास एक एजन्सी दिलेली आहे. मालवण तालुक्यात गॅसची कमतरता निर्माण होते म्हणून दि. 19.3.2011 रोजी आणखी एक एजन्सी दिलेली आहे. त्या व्यतिरिक्त स्व. राजीव गांधी रुरल गॅस योजनेअंतर्गत जवळपास 600 ते 1800 गावांच्या पातळीवर आपण नव्याने कनेक्शन्स देणार आहोत. त्यातूनच ओरोस आणि फोंडाघाट या ठिकाणी दोन एजन्सीज देण्याचे प्रस्तावित आहे.

श्री. विक्रम काळे : महोदय, उत्तरामध्ये गॅसधारकांना मागणीनुसार पुरवठा होत नसल्याचे म्हटले आहे, त्याबाबत शासन काय कारवाई करणार आहे ?

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 14026 .....

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मालवणमध्ये मागणी प्रमाणे गॅस सिलेंडरचा पुरवठा होत नव्हता त्यामुळे यासंदर्भातील समितीने अजून एक गॅस एजन्सी प्रस्तावित केली असून या नवीन एजन्सीला मान्यता देखील देण्यात आलेली असून आता जेवढी गॅसची मागणी राहील त्या प्रमाणे गॅस पुरवठा केला जाणार आहे.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हरकतीच्या मुद्याबाबत

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, जैतापूर जवळील माडबन येथील रहिवांशानी जपानमधील भूकंपग्रस्त व त्सुनामीग्रस्त नागरिकांना श्रध्दांजली वाहण्यासाठी परवा एक शोकसभा आयोजित केलेली आहे. मी स्वत: अणु ऊर्जेचा समर्थक आहे. माडबन येथील शोकसभेवर जिल्हाधिका-यांनी बंदी घातलेली आहे. भूकंपग्रस्त व त्सुनामीग्रस्त नागरिकांना श्रध्दांजली वाहण्यासाठी जी बंदी आणलेली आहे त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर चुकीचा संदेश जाण्याची शक्ता आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात हस्तक्षेप करावा अशी माझी विनंती आहे. नागरीकांनी लोकशाही मार्गाने श्रध्दांजली वाहण्यासाठी जी शोकसभा आयोजित केलेली आहे त्यावर बंदी आणणे योग्य नाही त्यामुळे यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करावा अशी माझी विनंती आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा : उप सभापति महोदय, मेरा औचित्य का मुद्दा है. सभापति महोदय ने औचित्य का मुद्दा पेश करने की मुझे अनुमति दी है. मुंबई महानगरपालिका में सफाई मजदूरों की भर्ती हो रही है. इस भर्ती के लिए मुंबई महानगरपालिका ने यह क्राइटेरिया डिसाइड किया है कि उम्मीदवारों को 4 किलोमीटर की दूरी 15 मिनट में तय करनी होगी. मुंबई महानगरपालिका ने अब यह समय बदलकर 25 मिनट कर दिया है. मेरा यह कहना है कि यह पुलिस या फौज की भर्ती नहीं है. यहाँ पर सफाई मजदूरों की भर्ती हो रही है और इस पद के लिए 4 किलोमीटर की दूरी एक निश्चित समय सीमा में पूरी कराने के लिए उम्मीदवारों से दौड़ लगवाना ठीक नहीं है. अगर कोई कॉर्डिॲक पेशेंट नौकरी के लालच में दौड़ लगाएगा तो वह गिर सकता है, मर सकता है. इसलिए इस प्रकार का क्राइटेरिया लागू न किया जाए, ऐसा मेरा सरकार से अनुरोध है.

उप सभापती : आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेतल्या जातील.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नवी मुंबईतील पनवेल नजीकच्या खांदेश्वर उपनगरातील कल्याणी महिला व बाल सेवा संस्थेमधील 5 मतिमंद मुलींचे झालेले लैंगिक शोषण

मु. शी. :नवी मुंबईतील पनवेल नजीकच्या खांदेश्वर उपनगरातील कल्याणी महिला व बाल सेवा संस्थेमधील 5 मतिमंद मुलींचे झालेले लैंगिक शोषण यासंबंधी सर्वश्री सर्वश्री हुसेन दलवाई, चरणसिंग सप्रा, विजय सावंत, हेमंत टकले, ॲड.उषाताई दराडे, सर्वश्री. विक्रम काळे, रमेश शेंडगे, सतीश चव्हाण, अरुण गुजराथी, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.दिपक सावंत, सर्वश्री.दिवाकर रावते, मनीष जैन,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नवी मुंबईतील पनवेल नजीकच्या खांदेश्वर या उपनगरात कल्याणी महिला व बाल सेवा संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या मतिमंद मुलींच्या बालगृहात तब्बल पाच अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण झाल्याची धक्कादायक घटना दि,४/३/२०११ च्या सुमारास उजेडात येणे, याप्रकरणी पोलिसांनी संस्थेचे संस्थापक रामचंद्र करंजुले यांच्यासह चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणे, या बालगृहात ज्या पाच मतिमंद मुलींचे लैंगिक शोषण होत होते त्यापैकी चार मुली मूकबधिर असणे, तसेच १४ ते १७ या वयोगटातील असणे, सदर घटनेमुळे सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेला असंतोष, राज्यशासनाने सदर घटनेतील आरोपींवर बलात्कारांचा गुन्हा दाखल करुन या चौघांवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रीया." "

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई : खांदेश्वर येथील कल्याणी महिला व बाल सेवा संस्थेमार्फत चालविल्या जाणा-या मतिमंद मुलींच्या बालगृहात एक अतिशय घृणास्पद घटना घडलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना फार महत्वाची आहे, सेन्सीटीव्ह आहे. माननीय गृहमंत्री माननीय मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी दोन मिनिटासाठी बाहेर गेलेले आहेत. त्यामुळे माननीय गृहमंत्री येई पर्यंत आपण दुसरी लक्षवेधी सूचना घेतली तर बरे होईल असे मला वाटते. या लक्षवेधीच्या संदर्भात काही धोरणात्मक निर्णय माननीय गृहमंत्र्यांना घ्यावे लागणार आहेत, त्यामुळे माननीय गृहमंत्री येईपर्यंत दुसरी लक्षवेधी सूचना घ्यावी अशी विनंती आहे.

उप सभापती : माननीय गृह राज्यमंत्री उत्तर देण्यास समर्थ आहेत.

श्री. हुसेन दलवाई : नवी मुंबईतील पनवेल नजीकच्या खांदेश्वर उपनगरातील कल्याणी महिला व बाल सेवा संस्थेमार्फत चालविल्या जाणा-या मतिमंद मुलींच्या बालगृहात घृणास्पद घटना घडलेली आहे. या मुलींचे वय 14 ते 17 दरम्यानचे आहे. ही जी घटना घडलेली आहे त्यामध्ये संस्थेचे चालक, पदाधिकारी, कर्मचारी हे सर्व सामील आहेत. याचा अर्थ या लोकांनी या अगोदर तेथे काय काय केले असेल याचा विचारच न केलेला बरा. या ठिकाणी केवळ 5 मुलींचे शोषण झाले आहे असे नसून यापेक्षा जास्त मुलींचे लैंगिक शोषण झाले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे व त्यामध्ये काय आढळून आलेले आहे याची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी अतिशय वाईट घटना घडली आहे. मतिमंद मुलीसाठी बालगृह सुरु करण्यासाठी या संस्थेला परवानगी देण्यात आली होती. उच्च न्यायालयाने सर्व बाल गृहाची तपासणी करण्यासाठी सी.डब्ल्यू.सी. कमिटी नेमली होती .या कमिटीच्या पहाणीमध्ये अशा प्रकारचा निष्कर्ष आल्यानंतर त्यांनी त्या पध्दतीच्या सूचना दिल्या होत्या आणि ही तपासणी केल्यानंतर काही बाबी पुढे आल्यानंतर संस्था चालकाच्या विरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांना अटकही करण्यात आली आहे.या संस्थेतील मुलींचे भविष्य काळातील नियोजन योग्य प्रकारे करावे अशी शासनाची भूमिका आहे . उच्च न्यायालयामध्ये या सर्व बाबी अत्यंत गांभीर्याने घेतलेल्या आहेत त्यामुळे आजच्या परिस्थितीमध्ये या सर्व आरोपींविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर मी स्वत: कळंबोली येथील त्या संस्थेमध्ये जाऊन आले होते तसेच पोलिसांना सुध्दा भेटले होते. वास्तविक पाहता अशा प्रकारच्या घटने संबंधीची लक्षवेधी सूचना मांडण्यात आल्यानंतर पोलीस तपासानंतर काय झाले या पेक्षाही या बालसुधार गृहाला परवानगी देणारे महिला बाल कल्याण विभागाचे, समाज कल्याण विभागाचे जे संबंधित अधिकारी आहेत त्यांनी व्यवस्थितपणे देखरेख न केल्यामुळे हा प्रसंग घडलेला आहे.ज्यांनी या कडे दुर्लक्ष केले आहे त्या अधिका-यांच्या विरुध्द देखील कारवाई करण्यात आली पाहिजे. कोर्टाकडून जर पोलिसांना आदेश दिला गेला नसता तर त्या संस्थेमध्ये असे गैरप्रकार चाललेले आहेत हे पोलिसांनासुध्दा कळले नसते. ज्या अधिका-यांवर या बाल सुधारगृहाची देखरेख करण्याची जबाबदारी होती त्या अधिका-याला निलंबित करण्यात येणार आहे काय, त्याच बरोबर या घटनेशी काही कर्मचारी देखील सबंधित असावेत अशी शक्यता नाकारता येत नाही तेव्हा त्यांनासुध्दा सह आरोपी करण्यात येणार आहे काय ? ही घटना घडल्यानंतर मी स्वत: त्या ठिकाणी गेले आणि त्याठिकाणच्या बाल कल्याण समितीच्या सदस्यांना विनंती केली होती की, या मुलींना मला भेटावयाचे आहे. तेव्हा त्यांनी मला असे सागितले की आम्हाला तुमच्याबद्दल आदर आहे तरीसुध्दा या मुलींना आम्ही कोणालाही भेटू देणार नाही व या मुलींना कर्जत येथे ठेवलेले आहे. त्यावेळी मी त्यांना असेही सांगितले की , या मुलींना मी कोठल्याही प्रकारे लज्जास्पद प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे....

विचारणार नाही अशी मी तुम्हाला हमी देते. या मुली त्या ठिकाणी सुरक्षित आहेत काय की त्याच्या ऐवजी दुस-याच मुली त्या सुधारगृहात आणून ठेवल्या आहेत ?त्यावेळी त्यांनी मला असे सांगितले की,कार्यकर्ते असो, महिला असो वा आमदार असो कोणालाही या मुलींना भेटू द्यावयाचे नाही असे आम्हाला बाल न्यायालयाचे आदेश आहेत. त्यामुळे या मुलीच्या सुरक्षिततेची हमी शासन कशी देत आहे ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, महिला व बाल कल्याण विभागाच्या अधिका-यांना निलंबित करण्याची कारवाई केलेली आहे. 2006 साली या संस्थेचा परवाना रद्द करण्यात आला होता . त्या काळातील अधिका-यांविरुध्द देखील कारवाई करावी अशा प्रकारची शासनाची भूमिका आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, त्याठिकाणी सहा महिन्यापूर्वी श्रीमती रुपा सिन्हा नावाच्या एका कार्यकर्तीने या बालसुधारगृहात काही गैरप्रकार चालतात अशा प्रकारे पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार केली होती.परंतु त्या तक्रारीची वेळीच दखल घेतली गेली नाही. अशा प्रकारच्या खाजगी संस्था, बालसुधार गृह किंवा आश्रमशाळा चालवितात त्यांना अनेकजण मदत करीत असतात. या बाल सुधारगृहात ही घटना घडल्यानंतर मी त्या ठिकाणी तसेच पोलीस स्टेशनमध्ये जाऊन आले होते. पोलिसांना या घटनेचे फारसे गांभीर्य वाटत नाही.वास्तविक या घटनेचे पोलिसांना गांभीर्य वाटावयास पाहिजे. होते.ज्या खाजगी संस्था मतिमंद मुलांसाठी, अनाथ मुलांसाठी वसतिगृह किंवा अनाथाश्रम चालवितात त्यावर शासनाचे, पोलिसांचे लक्ष असावयास पाहिजे. या बाल सुधारगृहात अशा प्रकारची घटना घडल्यानंतर असे दिसून येते की या संस्थेकडे कोणाचेही लक्ष नाही. श्रीमती रुपा सिन्हा यांनी पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर पोलिसांना गांभीर्य का वाटले नाही, त्याचबरोबर अनेक ठिकाणी लहान मुलांचे लैगिंक शोषण केले जाते, मतीमंद मुलींवर अत्याचार केले जातात कोणतीही व्यक्ती आश्रमशाळा किंवा बाल सुधारगृह चालविण्यासाठी शासनाकडे परवानगी मागत असते. परंतु त्या आश्रमशाळामध्ये किंवा बालसुधार गृहामध्ये काय चालते यावर कोणाचीही देखरेख नाही. तेव्हा या प्रसंगाने शासनाने सावध झाले पाहिजे आणि येथून पुढच्या काळात या मुलींवर अत्याचार होणार नाही याची काळजी घ्यावयास पाहिजे ती काळजी घेण्यात येणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, महिला व बाल कल्याण विभागातर्फे सर्व बाल सुधार गृहातील रुग्णांची तपासणी सिव्हील सर्जन मार्फत केली जाते ..

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ...

राज्यामध्ये जवळ जवळ 26 संस्थांना परवानगी दिलेली असून 22 केंद्राना अनुदान दिले जाते. त्यामध्ये 1 हजार 98 मतिमंद विद्यार्थी आणि विद्यार्थीनी रहातात. संपूर्ण राज्यातील या सर्वांची तपासणी 31 मार्चपर्यंत सिव्हिल सर्जनमार्फत करावी अशाप्रकारचे निर्देश देण्यात आले आहेत.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, ज्याठिकाणी ही घटना घडली आहे त्याठिकाणी मी देखील भेट दिली आहे. आमच्या महिला आघाडीने त्याठिकाणी धरणे आंदोलन केले होते, त्यामध्ये चार जणांना अटक करण्यात आली आणि उरलेल्या लोकांना नंतर अटक करण्यात आली. माझे याठिकाणी दोनच प्रश्न आहेत ते असे की, यापूर्वी देखील त्या बाल सुधारगृहामध्ये 7 मुलींचा मृत्यू झाला होता. त्यापूर्वी त्यांना जे.जे. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले होते व त्यांच्यावर उपचार करण्यात आले होते. तेव्हा त्यांचा मृत्यू कशामुळे झाला? या मुलींच्या बाल सुधारगृहामध्ये बाहेरुन तरुण मंडळी व माणसे कायमची ये जा करीत होती याची आपण चौकशी केली आहे काय, त्या संदर्भात कुणाला अटक केली आहे काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील :सभापती महोदय, ज्या मुलींचा मृत्यू झाला त्यांचे शव विच्छेदन करण्यात आले असून त्याचा अहवाल आपल्याजवळ आहे. त्याठिकाणी बाहेरुन काही मुले ये - जा करीत होती असे माननीय सदस्यांनी सांगितले आहे. परंतु त्याबाबत स्पष्टपणे नावे न देण्यात आल्यामुळे पोलिसांचा त्या दिशेने तपास सुरु आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, ही माणुसकीला काळीमा फासणारी घटना आहे. ही केवळ या मतिमंद मुलींच्या घटनेपुरती मर्यादित बाब नसून तिची व्याप्ती फार मोठी आहे. राज्यामध्ये अशाप्रकारची जेवढी मुलींची बालकाश्रमे असतील तेथील मुलींची सिव्हिल सर्जनमार्फत तपासणी केली जाईल असे मंत्री महोदयांनी सांगितले. हा प्रश्न ऐरणीवर आला म्हणून आपण अशी तपासणी करणार आहात की, यासाठी कायम स्वरुपी यंत्रणा हे सरकार राबविणार आहे? दुसरा प्रश्न असा की, अशाप्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत याकरिता हे सरकार फ्लाईंग स्क्वॅडची निर्मिती करणार आहे काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, भविष्य काळात बाल सुधार गृहातील मुलींची कायम स्वरुपी वैद्यकीय तपासणी सिव्हिल सर्जनमार्फत करण्याचे धोरण सरकारने स्वीकारले आहे. तसेच, ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या तक्रारी येण्याची शक्यता आहे किंवा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ...

माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी अशाप्रकारे फ्लाईंग स्क्वॅडच्या माध्यमातून तपासणी सुध्दा केली जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांना सांगू इच्छितो की, आपण यापुढे महिलांना त्यांच्या आरक्षणाबरोबर रक्षणाकरिता देखील आवाज उठविला पाहिजे. यामध्ये दोन-तीन महत्वाच्या गोष्टी आहेत. संपूर्ण रायगड जिल्हयामध्ये एकच सीडब्लूसी आहे. त्यामध्ये सहापैकी फक्त तीन लोक ॲक्टिव्ह आहेत. संपूर्ण ठाणे जिल्हयामध्ये एकच सीडब्लूसी आहे, त्यांनी डहाणूला जायचे, पालघरला जायचे आणि वाशीला सुध्दा जायचे. महिला व बाल कल्याण विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सीडब्लूसीचे विकेंद्रीकरण या बदलत्या काळामध्ये करणार काय, त्यांची संख्या वाढविणार काय? त्या ऑनररी असल्यामुळे दिवसाला 100 रुपयांच्या मोबदल्यात कुणीही व्हिजिट करण्यास तयार होत नाहीत. त्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत सरकारने विचार करावा. या प्रकरणातील मुली या शारीरिक आणि बौध्दिक दृष्टया मतिमंद असल्यामुळे ज्यावेळी ही केस कोर्टामध्ये उभी राहील त्यावेळी अगोदर दिलेल्या स्टेटमेंटप्रमाणे पुन्हा त्या स्टेटमेंट देऊ शकणार नाहीत. हे लक्षात घेऊन आपण या प्रकरणामध्ये स्पेशल फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण केले पाहिजे. रायगडची ही केस पोलीस प्रॉसिक्यूटर डिल करु शकणार नाही आणि म्हणून या केसमध्ये शासनाकडून कडक कारवाई झाली तर असे प्रकार थांबतील. याकरिता स्पेशल पोलीस प्रॉसिक्यूटर आपण नेमणार काय? जे पोलीस प्रॉसिक्युटर नेहमी कार्यरत रहात असतात, बिझी असतात त्यांना नेमण्यात येऊ नये.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

तेथे त्यांच्या व्यतिरिक्त अजून देखील काही चांगले लोक आहेत. श्री.निकमजी हे माझे चांगले मित्र आहेत. मला त्यांच्याविषयी काहीच म्हणावयाचे नाही. अशा वेळी संबंधित खात्याकडून या सेन्सेटीव्ह केसला डील करणारी माणसे मागविण्यात यावीत. तसेच यासाठी स्पेशल पब्लिक प्रॉसीक्युटर नेमणे गरजेचे आहे. या दोन्ही गोष्टी आपण करणार आहात काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सदरहू विषयाचे गांभीर्य पहाता या विशेष केससाठी निश्चितपणे स्पेशल पब्लिक प्रासीक्युटर नेमला जाईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्याला फास्ट ट्रॅक कोर्टाचा विषय माहिती आहे. तसेच तो आपल्या भागातील विषय आहे आणि फिजीकली चॅलेंज . .. .

उप सभापती : सगळे विषय आमच्या भागातीलच आहेत....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी सांगितल्याप्रमाणे यासाठी स्पेशल पब्लिक प्रॉसीक्युटर नेमला पाहिजे, तसेच करावे. त्याशिवाय काही होणार नाही. नाहीतर यातील सर्व आरोपी सुटणार आहेत. तुम्हाला संबंधित आरोपिंना सोडावयाचे आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ही बाब देखील तपासून त्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहामध्ये या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने अतिशय महत्वाचा प्रश्न चर्चेसाठी आलेला आहे. खाजगी संस्थांना मतिमंद मुलींची बालगृहे चालविण्यासाठी दिली जातात. कारण सगळीकडे शासनाच्या सोयी उपलब्ध नसतात, अशावेळी जर काही खाजगी लोक पुढाकार घेऊन मुलींची बालगृहे चांगल्या प्रकारे चालविणार असतील तर आपण ते काम त्यांना देतो.परंतु सर्वसाधारण अनुभव असा आहे की,ज्याठिकाणी अशा प्रकारची बालगृहे चालविण्यासाठी दिली जातात. नंतर त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मग अशा संस्थांमधून अनेक प्रकारचे गैरव्यवहार होण्यास सुरुवात होते. हे जर थांबवावयाचे असेल तर ज्या ठिकाणी शासनाचे पूर्ण नियंत्रण राहील अशा पध्दतीने विभागवार मतिमंद मुलींची बालगृहे असली पाहिजेत. या बालगृहांची एकूण संख्या लक्षात घेता मतिमंद मुलींच्या बाबतीत होणारे दुर्दैवी प्रसंग रोखण्यासाठी आपण निश्चितपणे काही उपाययोजना करण्याच्या दृष्टीने विचार करणार आहात काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी महिला व बाल विकास ..... विभागातर्फे फ्लाईंग स्कवॉडची नेमणूक करण्यात येईल. तसेच भविष्यकाळामध्ये अशा पध्दतीच्या ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील . . .

घटना घडू नयेत यासाठी ज्या-ज्या उपाययोजना करता येतील, त्या करण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

. . . .पी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शासकीय रुग्णालयातील औषधोपचाराच्या व वैद्यकीय सुविधांच्या दरामध्ये करण्यात आलेली वाढ

मु. शी. : शासकीय रुग्णालयातील औषधोपचाराच्या व वैद्यकीय सुविधांच्या दरामध्ये करण्यात आलेली वाढ यासंबंधी सर्वश्री डॉ.दीपक सावंत,डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री. दिवाकर रावते, मनीष जैन, राजन तेली, एस.क्यू.जमा, एम.एम.शेख, चरणसिंग सप्रा, श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील शासकीय रुग्णालयातील औषधोपचाराचे व वैद्यकीय सुविधांचे दरामध्ये राज्य शासनाने दि.30.12.2010 रोजीपासून वाढ करण्याचा निर्णय घेणे, शासकीय रुग्णालयात साधारणपणे आर्थिकदृष्ट्या मागासलेले रुग्ण जात असल्यामुळे त्यांना सोसावा लागणारा आर्थिक भुर्दंड, एचआयव्ही, एमआरआय, अँजिओप्लास्टी, कोबाल्ट थेरपी, नेत्रशल्य चिकित्सा, जॉईंट रिप्लेसमेंट, मज्जातंतू इत्यादी महत्वाच्या औषधोपचारामध्ये करण्यात आलेली भरमसाठ दरवाढ, सदर दरवाढ पूर्वीच्या दरापेक्षा दुप्पटीने असल्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, दरवाढीबाबत फेरविचार करण्याची आवश्यकता,याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

डॉ.विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .पी-4

23-03-2011 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) P-4

APR/ KGS/ KTG/ 13:15

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, राज्य शासनाने दि. 30-12-2010 पासून शासकीय रुग्णालयामध्ये केले जाणारे औषधोपचार आणि तेथे वेगवेगळया ज्या वैद्यकीय सुविधा दिल्या जातात,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांचे दर वाढविले आहेत. जरी काहींच्या बाबतीत ही वाढ मार्जीनल असली तरी काही गोष्टींच्या बाबतीत या दरामध्ये जवळजवळ दुप्पटीने वाढ झालेली आहे. मला कल्पना आहे की, दिनांक 30 डिसेंबर 2010 रोजी आपला जी.आर.प्रसिध्द झाला. 2001 पासून जवळजवळ ही बाब प्रलंबित आहे. याची मला कल्पना असली तरी देखील शासकीय रुग्णालयामध्ये उपचारासाठी जे लोक जातात ते अतिशय गरीब असतात. तेथे सर्वसामान्य रुग्ण येतात. आता एच.आय.व्ही., एम.आर.आय. एन्जोप्लास्टी, कोबाल्ट थेरपी, नेत्र शल्य चिकित्सा, जॉईंट रिप्लेसमेंट आणि मज्जातंतू यावरील जे उपचार आहेत त्यांच्या दरामध्ये वाढ झालेली आहे. कोबाल्ट थेरपीमध्ये साधारणपणे 5000 रुपयांची वाढ झाली आहे. पूर्वी त्यासाठी दोन ते अडीच हजार रुपये घेण्यात येत होते, ही माहिती मी उदाहरणादाखल दिली आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, राज्य शासनाने याबाबत पुनर्विचार करावा. मी सर्व बाबतीत म्हणत नाही पण काही बाबतीतील दरवाढी बाबत पुनर्विचार करण्यात येणार आहे काय? तसेच दुसरा प्रश्न असा की, आज महाराष्ट्रात जीवनदायी योजना जवळजवळ बंद आहे. हा प्रश्न आपल्या विभागाशी संबंधित नसला तरी मला असे सांगावयाचे आहे की, आपण सहा जिल्ह्यामध्ये आरोग्य कार्ड देणार होता, पण तसे अजूनही झालेले नाही. यासाठी माननीय मंत्री महोदयांनी जवळजवळ 1 हजार कोटी रुपये मागणी केली होती. पण ते देखील अद्यापपर्यंत दिलेले नाहीत

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

त्यामुळे ही योजना जवळ जवळ बंद आहे. मग गरीब लोकांनी जावयाचे कुठे? जे दारिद्रय रेषेखाली नाहीत, पण दारिद्रय रेषेच्या थोडेसे वर, मधल्या गटात आहेत त्यांनी जावयाचे कुठे? म्हणून, जीवनदायी योजनेंतर्गत देखील यांचा अंतर्भाव करण्यात येईल काय, असा माझा प्रश्न आहे.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन 2001 साली औषधे, वेगवेगळया प्रकारच्या तपासण्या आणि शस्त्रक्रिया यांचे दर फायनल कले होते. मधल्या काळामध्ये त्याच्यामध्ये वाढ करण्याचा विचार झाला पण काही कारणास्तव ते होऊ शकलेले नाही. सन 2001 मध्ये ज्यावेळी हे दर ठरविण्यात आले त्यावेळी सर्वसाधारणपणे अशीही मंजुरी घेतली होती की, या दरांमध्ये दर दोन वर्षांनी पंधरा ते वीस टक्क्यांनी वाढ केली जाईल. आता दर ठरविण्यात येत असताना केंद्र शासनाच्या रुग्णालयाचे दर, महालगरपालिकेच्या रुग्णालयाचे दर आणि खाजगी रुग्णालयांच्या दराचा विचार करुनच समितीने अशा प्रकारचे दर वाढविण्याचे ठरविले आहे. सभापती महोदय, सन्मानीय सदस्यांनी दारिद्रय रेषेखालील रुग्णांच्या बाबतीत सांगितले तसेच दारिद्रय रेषेच्यावर जो गट आहे त्या गटासाठी हे दर अडचणीचे होतील किंवा त्यांना उपचार मिळणे कठीण होईल, असेही सांगितले. मेडिकल कॉलेज रुग्णालयात जे रुग्ण येतात त्यामधील 80 टक्के रुग्ण जवळ जवळ फ्री उपचार घेत असतात. त्यामध्ये प्रमुख्याने दारिद्रय रेषेखालील लोक, एम.एल.सी., ज्येष्ठ नागरिक, स्वातंत्र्य सैनिक, आश्रमशाळेतील विद्यार्थी या सर्वांना फ्री उपचार दिले जातात. ज्या रुग्णांच्या दरामध्ये 20 टक्के वाढ केलेली तो ग्रुप असा आहे की, ते थोडेफार पैसे भरु शकतात. सभापती महोदय, आता जी दर वाढ करण्यात आलेली आहे ती महानगरपालिकेच्या रुग्णालयातील दरापेक्षा कमी आहे, एवढेच नाही तर काही बाबतीतील दर त्यांच्यापेक्षा निम्मे आहेत. गेल्या दहा वर्षामध्ये या रुग्णालयांसाठी मोठया प्रमाणात यंत्रसामुग्री, साधनसमुग्री घेतलेली आहे. या यंत्रसामुग्रीचा दर्जा टिकवायचा असेल तर त्यासाठी जे थोडेफार पैसे देऊ शकतात त्यांच्यावर हा भार टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे करण्यात आलेली दरवाढ निश्चितपणे योग्य आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित....

सन्मानीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जीवनदायी योजनेच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. जीवनदायी योजना 6 जिल्ह्यामध्ये सुरु करण्यात आलेली आहे. येत्या वर्षामध्ये ती सर्व जिल्ह्यामध्ये सुरु करण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी आजच खालच्या सभागृहात सांगितले आहे. ज्यांचे उत्पन्न एक लाख रुपयाच्या आत असेल त्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. त्यामुळे तो प्रश्न आता मार्गी लागेल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आजही सर जे.जे.रुग्णालयात गेलो तर तेथील एम.आर.आय. आणि सिटी स्कॅनची मशीन बंद असते त्यामुळे या मशीनच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या तपासण्या करण्याकरिता रुग्णांना बाहेर पाठविले जाते. एन्झाईम्स तपासायला बाहेर पाठविण्यात येते. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांचे ब्लड सॅम्पल काल जे. ज. रुग्णालयातून बाहेर पाठविण्यात आले असे असेल तर या रुग्णालयात कोणत्या तपासण्या करण्यात येतात? सन्माननीय सदस्य श्री. रावते यांचा पी.ए.श्री. अशोक स्वत: रक्ताचे सॅम्पल घेऊन बाहेर गेले होते. सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे. मुंबईत जे.जे. सारख्या रुग्णालयाची ही अवस्था आहे. अशा प्रकारे दर वाढवून लोकांना सुविधा दिल्या जाणार आहेत काय, का परत ब्लड सॅम्पल तपासणीसाठी बाहेरच्या प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यात येणार आहे? सभापती महोदय, त्यांचे टायअप असते. एक्सरे मशीन, सिटी स्कॅन मशीन, एम.आर.आय. मशीन आणि प्रयोगशाळा बंद करण्यात येते आणि त्या संदर्भातील तपासणीसाठी रुग्णांना बाहेर पाठविण्यात येते. या रुग्णालयातून सेप्ट्रॉन आणि पॅरासिटेमॉल एवढीच औषधे देण्यात येतात. 80 टक्के रुग्णांना फ्री उपचार दिले जातात असे या ठिकाणी सांगण्यात आले पण त्यासाठी केंद्र शासनाकडून पैसे येतात. मुंबई सोडून इतर ठिकाणच्या रुग्णालयात जे फ्री उपचार दिले जातात त्यासाठी केंद्र शासनाकडून पैसे दिले जातात. औषधासाठी, यंत्र घेण्यासाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळते. सभापती महोदय, यानंतर शासकीय रुग्णालयात होणाऱ्या चाचणीसाठी एवढे पैसे दिल्यानंतर एकाही रुग्णाला बाहेर पाठविले जाणार नाही यासंबंधात या सभागृहाला आश्वासित केले जाईल काय?

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड....

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मघाशी विचारलेल्या एका प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे राहून गेले आहे. एचआयव्ही आणि एड्सच्या बाबतीत सर्व उपचार मोफत करतो.

डॉ. दीपक सावंत : पीसीआर टेस्टला 2 हजार रुपये चार्ज करता. आपण एलायझा टेस्ट मोफत करतो पण केंद्र शासन सांगते म्हणून आपण ते मोफत करतो.

डॉ. विजयकुमार गावित : ते राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये समाविष्ट आहे..

डॉ. दीपक सावंत : आपण तो खर्च राष्ट्रीय कार्यक्रमाच्या अंतर्गत करतो. ते राज्याचे पैसे नाहीत.

डॉ. विजयकुमार गावित : पैसे कोणाचेही असले तरी शेवटी योजना मेडिकल कॉलेजमधून राबविली जाते.

डॉ. दीपक सावंत : राज्य शासन काय करते हा प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदयांनी गोलगोल उत्तर देऊ नये.

डॉ. विजयकुमार गावित : पैसे केंद्र शासनाकडून येतात किंवा राज्य शासनाकडून येतात यापेक्षा तो निधी त्या मेडिकल कॉलेजच्या फंडात येऊन मग त्यामधून निधी वापरला जातो.

डॉ. दीपक सावंत : तो निधी योग्य ठिकाणी जातो का ? आपण इतका चार्ज केल्यानंतर एकही रुग्ण बाहेर इन्व्हेस्टीगेशनसाठी किंवा औषधासाठी जाणार नाही का ?

डॉ. विजयकुमार गावित : ते जाणार नाहीत याची काळजी निश्चितपणे घेतली जाईल.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बेनामी कंपनी उघडून कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याच्या आरोपाखाली उप जिल्हाधिकारी नितेश ठाकूर यांना झालेली अटक

मु. शी. : बेनामी कंपनी उघडून कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याच्या आरोपाखाली उप जिल्हाधिकारी नितेश ठाकूर यांना झालेली अटक यासंबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल, संजय केळकर, रामनाथ मोते, नागो गाणार, नितीन गडकरी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बेनामी कंपनी उघडून कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याच्या आरोपाखाली उप जिल्हाधिकारी नितेश ठाकूर यांना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मुंबईमध्ये दि.9 फेब्रुवारी, 2011 रोजी अटक करणे, तब्बल 148 कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप पोलिसांनी त्यांच्यावर ठेवणे, जे.जे. रुग्णालयात विशेष कार्य अधिकारी या पदावर नेमणूक झाल्यापासून नितेश ठाकूर नोकरीवर नसणे, त्यापूर्वी राज्य सरकारच्या हौसिंग बोर्डावर त्यांची नियुक्ती झालेली असणे, राज्य शासनाच्या नियुक्तीवर असल्यामुळे व्यवसाय करता येत नसल्याने त्याने वेगवेगळ्या नावाने बेनामी कंपन्या स्थापन करणे, त्यापैकी एसकार्ड इन्फ्रासोल प्रा.लि. इत्यादी कंपन्या स्थापन करुन त्याद्वारे बेकायदेशीर मिळवलेला पैसा जनरेट करण्याचा केलेला प्रयत्न, सदर कंपनीत भागीदार घेऊन त्या भागीदारांना धमकावून त्यांचीही केलेली आर्थिक फसवणूक, उप जिल्हाधिकारी या पदावर काम करणाऱ्या या अधिकाऱ्याने स्वत:च्या पदाचा व अधिकाराचा उपयोग स्वत:च्या स्वार्थाकरिता करुन 150 ते 200 कोटी रुपयांची अवैध संपत्ती कमवणे, या व अशा अधिकाऱ्यांची सीबीआयमार्फत चौकशी करण्याची नितांत आवश्यकता व अशा अधिकाऱ्यांना प्रशासनातून ताबडतोब बडतर्फ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना आणि त्यावर शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये आदर्श घोटाळ्यासंबंधी चर्चा झाली आणि संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशामध्ये आदर्शच्या इमारतीच्या उंचीच्या बाबतीत जी चर्चा झाली त्यामध्ये सगळ्यात महत्वाचे म्हणजे अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन आदर्शच्या इमारतीची उंची वाढविली असा निष्कर्ष आता सगळ्यांसमोर आलेला आहे. तशाच प्रकारे महाराष्ट्रातील एक उप जिल्हाधिकारी नितेश ठाकूर, जे आपल्या महाराष्ट्राच्या सेवेमध्ये होते, त्यांनी अनेक बेनामी कंपन्या काढून 148 कोटी रुपयांची माया गोळा केली. एवढेच नव्हे तर स्वत:च्या अधिकाराचा वापर करुन अनेक जणांना धमकावले आहे. त्यांनी आपल्यासोबत काम करणाऱ्या एका कंपनीच्या मालकाला, जे कंसल्टंट म्हणून त्यांच्यासोबत कामाला होते त्यांना सुध्दा धमकावले. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर आलेले आहे. 8 नोव्हेंबर, 2010 ला तक्रार आली आणि नितेश ठाकूर यांना 8 फेब्रुवारी, 2011 ला अटक झाली. ही दिरंगाई कशामुळे झाली ? एक अधिकारी हाऊसिंग डिपार्टमेंटमध्ये काम करीत असताना त्यांची बदली जे.जे.इस्पितळमध्ये विशेष कार्य अधिकारी म्हणून झाल्यानंतर 7 वर्षे आजारपणाची रजा टाकून तो या ठिकाणी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन दीडशे कोटी रुपयांची माया गोळा करतो तोपर्यंत जे.जे.इस्पितळासारख्या अतिशय महत्वाच्या रुग्णालयाची जबाबदारी दिलेला अधिकारी 7 वर्षापासून आजारपणाच्या रजेवर आहे ही गोष्ट शासनाला माहीत होत नाही का ? ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. तो अधिकारी जर 7 वर्षापासून आजारपणाच्या रजेवर होता तर त्याची शासनाला कोणतीही कल्पना नव्हती का, त्या ठिकाणी दुसरा अधिकारी नेमण्याचा विषय नव्हता का, या अधिकाऱ्याला अटक करण्यामध्ये एवढी दिरंगाई का झाली ? वेळोवेळी या सभागृहामध्ये कोठल्या ना कोठल्या विषयावर चर्चा होत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांनी आपली संपत्ती जाहीर केली पाहिजे. यांना अटक करण्यासाठी एवढी दिरंगाई का झाली ? या अधिकाऱ्याच्या नावाने आता सुध्दा 9 लक्झरीयस गाड्या आहेत. लँड क्रुझरपासून सगळ्या गाड्या या अधिकाऱ्याच्या नावावर आहेत. अतिशय मोठा बंगला या अधिकाऱ्याच्या नावावर आहे. या गुन्ह्यामध्ये 5 आरोपी निष्पन्न झाले. 5 पैकी 2 आरोपींना अटक झाली आणि 2 आरोपींना अटकपूर्व जामीन मिळाला. एका आरोपीला अटक झालेली नाही

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

150-150 कोटी रुपयांची संपत्ती अधिकारी गोळा करीत असतील तर या गुन्हेगाराला अटक करण्यासाठी एवढी दिरंगाई का झाली ? या अधिकाऱ्यांना निलंबित केल्याचे लेखी उत्तरात नमूद केले आहे. त्यांना निलंबित केले असले तरी पुन्हा कामावर घेतले जाईल, पुन्हा निलंबित केले जाईल, पुन्हा बढती दिली जाईल. हे सर्व टाळून या अधिकाऱ्यांना शासन सेवेतून बडतर्फ करणार आहे काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ही घटना 20 सप्टेंबर महिन्यात घडली असली तरी प्रत्यक्षात 7 तारखेला गुन्हा दाखल करण्यात आला आणि त्याचवेळी आरोपीला अटक करण्यात आली आहे. याबाबतची वस्तुस्थिती पाहिली तर आरोपी नितेश ठाकूर यांनी एस.डी.कार्पोरेशन या कंपनीबरोबर कांदिवली येथील जागा विकसित करण्याबाबत एक करार केला होता. त्यातून जे पैसे मिळतील त्यातील 5 टक्के कमिशन वाघेला यांना देण्याचे कबूल केले होते. या कमिशनच्या मुद्यावरुन त्यांच्यात वादावादी होऊन ते कमिशन देता येऊ नये यासाठी धमकीचा प्रयत्न झाला, यासंदर्भात वाघेला यांनी फिर्याद दिली. त्यामुळे त्यांना ताबडतोब अटक केलेली आहे. दोघांना अटकपूर्व जामीन मिळालेला आहे ही वस्तुस्थिती खरी आहे. प्रमुख आरोपी नितेश ठाकूर यांना हे न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. हे अधिकारी गेली अनेक वर्षे अनेक पदावर होते. त्यांना निलंबित करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा कामावर घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, नितेश ठाकूर असोत, कल्याण-डोंबिवली महानगपालिकेचे अभियंते जोशी असोत. आमदारांना निवडणुकीचा फॉर्म भरत असताना आपली मालमत्ता जाहीर करावी लागते. पण अधिकाऱ्यांना सांगितल्यानंतरही ते आपली मालमत्ता जाहीर करणार नसतील आणि अशी घटना घडल्यानंतर 150 कोटी, 200 कोटी, 500 कोटी रुपये बाहेर येत आहेत. ज्या अधिकाऱ्यांनी आपली मालमत्ता जाहीर केलेली नाही असे किती अधिकारी आहेत आणि त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला जाणार आहे का ?

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ही बाब निश्चितपणे तपासून घेतली जाईल आणि सत्य परिस्थिती जाणून घेऊन ती सभागृहाला अवगत केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वाघेला यांनी तक्रार केल्यानंतर हे गुन्हे रजिस्टर्ड झाले. ही लक्षवधी सूचना दाखल केल्यानंतर दिनांक 14.2.2011 रोजी नितेश ठाकूर यांना निलंबित करण्यात आले. हे अधिकारी गेली 7 वर्षे जे.जे.हॉस्पिटलमधून रजेवर गेले आहेत. या रजेच्या कालावधीत ते कोठे होते याची चौकशी विभागाने केली की नाही ? 7 वर्षे वैद्यकीय रजा असू शकते काय, या राज्यातील एक अधिकारी बेनामी कंपन्या स्थापन करुन करोडो रुपयांची माया जमवून लोकांना लुबाडतो, लोकांची फसवणूक करतो अशा अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी सीआयडीमार्फत केली जाणार आहे का ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी हे अधिकारी 7 वर्षे रजेवर आहेत असे सांगितले आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. ज्या ज्याठिकाणी ते कार्यरत होते, त्या कालावधीची महसूल खात्यामार्फत कारवाई होणे अपेक्षित आहे. एसीबीमार्फत नितेश ठाकूर यांच्या संपूर्ण मालमत्तेची ओपन चौकशी शासनाने चालू केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : नितेश ठाकूर हा 7 वर्षे रजेवर होता. या रजेसाठी त्याने कोणत्या डॉक्टरचे सर्टिफिकेट घेतले ? तो जे.जे.हॉस्पिटलमध्ये कामाला होता. ज्या डॉक्टरने बोगस सर्टिफिकेट दिले त्याच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? नितेश ठाकूर अलिबागचा असून मुरुडमध्ये त्याचे वास्तव्य आहे. सूर्यारोशनी कडून त्याने जमीन विकत घेतली होती. नंतर ती शेतक-यांना परत केली गेली. त्या जमिनीची किंमत जवळ जवळ 100 कोटी रुपये आहे. सभापती महोदय, या प्रकरणी माननीय गृहमंत्र्यांनी सदनाला वस्तुस्थिती सांगितली पाहिजे. म्हणून ही लक्षवेधी राखून ठेवावी. मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना दोष देत नाही. सभापती महोदय, आम्ही या सभागृहामध्ये एक महिना आधी प्रश्न विचारतो. हा विषय महसूल खात्याशी देखील संबंधित असल्यामुळे दोन्ही विभागाच्या मंत्री महोदयांनी एकत्रितपणे उत्तर देणे आवश्यक आहे ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे होती. म्हणून ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी माझी विनंती आहे.

उप सभापती : या लक्षवेधी सूचनेवरील सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना माननीय गृह राज्यमंत्री व्यवस्थित उत्तरे देत आहेत. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची आवश्यकता नाही.

श्री. जयंत प्र. जाधव : सभापती महोदय, 7 वर्षे कोणी अधिकारी रजेवर राहू शकतो काय ? तो अधिकारी डेप्युटेशनवर आहे. या अधिका-याला बोगस सर्टिफिकेट देणा-या डॉक्टरवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : हा विषय गंभीर आहे. नितेश ठाकूर याने कशा पध्दतीने वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले, कोणत्या परिस्थितीमध्ये तो 7 वर्षे रजेवर होता याबाबतची संपूर्ण चौकशी निश्चितपणे करण्यात येईल.

श्री संजय केळकर : या प्रकरणी सर्टिफिकेट देणारे डॉक्टर तर जबाबदार आहेतच. पण 7 वर्षे कोणत्या अधिका-याने रजा मंजूर केली, कोणत्या अधिका-याने त्याला पाठिशी घातले ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : या प्रकरणी जे वैद्यकीय अधिकारी आणि संबंधित अधिकारी दोषी आढळतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : लक्षवेधी सूचनेवरील चर्चेसाठी दिलेली वेळ संपलेली आहे. एकेका लक्षवेधी सूचनेसाठी जास्त वेळ घेऊ नये अशी मी सन्माननीय सदस्यांना सारखी विनंती करीत होतो. लक्षवेधी सूचना क्रमांक 4 ही माननीय सभापतींना विचारुन नंतर घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.38 ते 2.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: सन 2011-2012 चा अर्थसंकल्प सादर करणे

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2011-2012 चा अर्थसंकल्प मी सभागृहाला सादर करीत आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले अर्थसंकल्पीय भाषण कृपया छापावे.)

नंतर 2एच.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पिय भाषणाचे वाचन केले.)

यानंतर कु.थोरात . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले)

"जनतेला काम हवे याची आम्हाला जाण आहे
महाराष्ट्राच्या विकासाचे या सरकारला भान आहे."

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले.)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले.)

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23-03-2011 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) GG

SGJ/ ST/ D/ KGS/ KTG/

15:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(वित्त मंत्र्यांच्या भाषणा नंतर)

सभापती : सन 2011-2012 चा अर्थसंकल्प सभागृहास सादर करण्यात आला आहे. सूटकेसमधून अर्थसंकल्पीय प्रकाशने सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे तळ मजल्यावरील वितरण केंद्रावर करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी वितरण केंद्रावरुन सदर प्रकाशने घ्यावीत.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. गुरुवार, दिनांक 24 मार्च,2011 रोजी सकाळी 10.30 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

सकाळी 10.30 ते 12.30 या वेळेत सत्ताधारी पक्षाच्या रोजगारा संबंधीच्या प्रलंबित प्रस्तावावर चर्चा मंत्र्यांच्या उत्तरासह पूर्ण करण्यात येईल आणि सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वाजता भरेल

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 6 मिनिटांनी, गुरुवार दिनांक 24.3.2011 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही